


# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com




* वर्ष ६५ वे * अंक ५९ * नांदेड * मंगळवार, दि. ३ मार्च २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

गोदातीर समाचार



## आज धुलिवंदन

धुलिवंदनानिमित्त सर्वांना हार्दिक शुभेच्छा!

– मुख्य संपादक

## सुट्टीची सूचना

आज धुलिवंदनानिमित्त कार्यालयास सुट्टी असल्याने उद्या दि. ४ मार्च २०२६ चा गोदातीर समाचारचा अंक प्रकाशित होणार नाही. तरी वाचक, जाहिरातदार, एजंट यांनी याची नोंद घ्यावी.

– व्यवस्थापक

# माजी कुलगुरू डॉ. जनार्दन वाघमारे यांचे निधन

**लातूर (प्रतिनिधी)–** माजी खासदार, माजी कुलगुरू आणि थोर विचारवंत डॉ. जनार्दन माधवराव वाघमारे यांचे सोमवारी सकाळी साडेआठ वाजता निधन झाले. त्यांच्या निधनाने शिक्षण, समाजकारण आणि सार्वजनिक जीवनातील एक ज्येष्ठ, अभ्यासू व वैचारिक नेतृत्व काळाच्या पडद्याआड गेले आहे.

डॉ. वाघमारे यांच्या पार्थिवावर त्यांचे मूळगाव कवठा, ता. औसा, जि. लातूर येथे मंगळवार, दि. ३ मार्च रोजी सकाळी ११ वाजता अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. शिक्षण, समाजकारण आणि राजकारण या तिन्ही क्षेत्रांत त्यांनी केलेले भरीव व दूरदृष्टीपूर्ण कार्य समाजासाठी



दिशादर्शक ठरले. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राच्या वैचारिक विश्वात मोठी पोकळी निर्माण झाली आहे.

११ नोव्हेंबर १९३४ रोजी जन्मलेल्या डॉ. वाघमारे यांनी आयुष्यभर शिक्षण आणि सामाजिक परिवर्तनाच्या कार्यासाठी स्वतःला वाहून घेतले. शिक्षणतज्ज्ञ, साहित्य अभ्यासक आणि राजकारणी म्हणून त्यांनी राज्यात व देशात स्वतंत्र ओळख निर्माण केली.

डॉ. वाघमारे हे नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे संस्थापक व पहिले कुलगुरू होते. विद्यापीठाच्या स्थापनेपासून शैक्षणिक पायाभूत रचना उभारण्यापर्यंत त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. मराठवाड्यात उच्च शिक्षणाची दारे सर्वसामान्यांसाठी खुली करण्यामागे त्यांचा मोठा वाटा होता. इंग्रजी साहित्याचे प्राध्यापक म्हणून त्यांनी दीर्घकाळ अध्यापन केले. निग्रो साहित्य, दलित साहित्य आणि पुरोगामी साहित्य चळवळीवर त्यांनी सखोल अभ्यासपूर्ण लेखन व संशोधन केले. सामाजिक न्याय, समता आणि परिवर्तनवादी विचारसरणी यांवर त्यांनी परखड मांडणी केली.

# रस्त्यावर उभे राहून रंग फेकणे टाळावे, अन्यथा कारवाई

## पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांचा इशारा

**नांदेड (प्रतिनिधी)–** आज साजरा होणाऱ्या धुलिवंदन सणानिमित्त नागरिकांनी रस्त्यावर उभे टाकून रंग फेकणे टाळावे, अन्यथा कारवाईला सामोरे जावे लागेल, असा इशारा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी दिला आहे.

होळी व धुलिवंदनाच्या सणाच्या काळात दारू पिऊन वाहन चालवणे किंवा रस्त्यावर बेशिस्त, नियम न पाळणारे वाहन चालवणे अत्यंत धोकादायक ठरते. अशा वाहन चालकांविरुद्ध भारतीय न्याय संहिता, ट्रॅफिक कायदे यानुसार कठोर कारवाई केली जाईल. यात वाहन ताब्यात घेणे, दंड आकारणे, ड्रायव्हिंग लायसन्स रद्द किंवा निलंबित करणे यासह इतर कायदेशीर उपायांचा समावेश होतो. नागरिकांनी आपल्या जीवनाची आणि इतरांचे संरक्षण करण्यासाठी नियम पाळणे आवश्यक आहे.

नागरिकांनी सणाच्या आनंदात शिस्त न विसरता वर्तन करावे. अपघात किंवा अन्य त्रास होऊ नये म्हणून नियम पाळणे आवश्यक आहे. आपले आणि इतरांचे जीवन सुरक्षित ठेवण्यासाठी नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन पोलीस प्रशासनाच्यावतीने करण्यात आले आहे.






**नांदेड :** होळी सणानिमित्त शहरातील आनंदनगर भागात असलेल्या संत पाचलेगावकर आश्रम येथे होलिका दहन करण्यात आले. यावेळी महिला-पुरूषांची मोठ्या संख्येने गर्दी होती. (छाया : करणसिंह बैस)

# इराणचा अमेरिकन तळांवर चौफेर हल्ला

## अवघं नेतृत्व संपवूनही इराणी मिसाईल कोण चालवतंय अन् नेतृत्व कोण करतंय याचाच थांगपत्ता लागेना

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी आणि ४० उच्चपदस्थ इराणी अधिकाऱ्यांच्या हत्येनंतर इराण आखातातील अमेरिकेच्या मालमत्तेवर चौफेर हल्ले करत आहे. या हल्ल्यांमध्ये बहरीनमध्ये एकाचा मृत्यू झाला आहे. इराक आणि कुवेतमध्ये इराणी हल्ल्यांचे प्रमाण जास्त असल्याचे वृत्त आहे.


अमेरिकेचं राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सर्व उद्दिष्टे साध्य होईपर्यंत इराणवरील हल्ले सुरूच राहतील आणि तीन अमेरिकन सैनिकांच्या मृत्यूचा बदला घेण्याचे आश्वासन दिले आहे. मात्र, इराणचे नेतृत्व संपवूनही इराण इतका प्रतिसाद कसा देत आहे, यामुळे ट्रम्प प्रशासन आणि पेंटागॉन चिंतेत असल्याचे वॉशिंग्टन पोस्टने सुत्रांच्या हवाल्यानं म्हटलं आहे. इराणमध्ये सध्या क्षेपणास्त्रे डागण्याचे आदेश नेमके कोण देत आहे आणि या शस्त्रास्त्रांवर नक्की कोणाचे नियंत्रण आहे, याबद्दल अमेरिकन लष्करी अधिकारी चिंतेत आहेत. इराणसोबतचा संघर्ष हाताबाहेर जात असल्याची भीती पेंटागॉन आणि ट्रम्प प्रशासनातील सदस्यांना वाटत आहे. आठ महिन्यांपूर्वी १२ दिवसांच्या युद्धात, इराणला सावरण्यासाठी १२ तास लागले होते. त्यावेळी त्यांच्यावर अचानक हल्ला झाल्याने त्यांना मोठा धक्का बसला होता. त्या घटनेनंतर इराणच्या नेतृत्वाने आगामी युद्धाची पूर्ण तयारी करून ठेवली होती.




# सोन्याचे दर ७,३७२ रुपयांनी वाढले

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** अमेरिका, इस्त्रायल आणि इराण यांच्यातील युद्धाचे परिणाम सोन्याच्या दरावर झाले आहेत. सोन्याच्या दरात ७३७२ रुपयांची वाढ झाली आहे. आयबीजेएनं जारी केलेल्या दरांनुसार शुक्रवारच्या तुलनेत सोमवारी सोन्याचे दर ७,३७२ रुपयांनी वाढून १,६६,४६९ रुपयांवर पोहोचले आहेत. २९ जानेवारीला सोन्याच्या दरानं १,७६,१२१ रुपयांचा उच्चांक गाठला होता. म्हणजेच त्या तुलनेत सध्या सोनं ९,६५२ रुपयांनी स्वस्त आहे.

आयबीजेएनं जारी केलेल्या दरांनुसार २४ कॅरेट सोन्याचा दर १,६६,४७० रुपयांवर पोहोचला आहे. तर २२ तोळ्यांचा एका ग्रॅमचा दर १६२४७० रुपयांवर पोहोचला आहे. २० कॅरेट सोनं १४८१६० रुपयांवर पोहोचलं असून १८ कॅरेट सोन्याचा एका तोळ्याचा दर १,३४,८४० रुपये आहे. तर, १४ कॅरेट सोन्याचा दर देखील १,०७,३८० रुपये प्रति १० ग्रॅम आहेत.






जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन

संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ

गोदातीर समाचार

संपादक
केशव घोणसे पाटील

# 'होली है', पण सांभाळून!

होळी आणि धुलीवंदन हा रंगांचा, उत्साहाचा आणि सामाजिक ऐक्याचा सण. वर्षभराच्या धकाधकीनंतर मनमोकळेपणाने आनंद व्यक्त करण्याची ही संधी असते. आज रंग उधळणार! या भावनेतून अनेकजण आधीपासूनच तयारीला लागतात. गोडधोड पदार्थ, मित्रमंडळींची मैफल आणि रंगांची उधळण, या सगळ्यांतून सणाची रंगत वाढते. परंतु या आनंदाच्या उत्सवाला बेफिकीरीची किनार लागली, तर तोच सण इतरांसाठी त्रासदायक ठरू शकतो, हेही तितकेच खरे आहे. या निमित्ताने 'खाणे-पिणे' हा भाग अपरिहार्य मानला जातो. मात्र 'पिणे' या शब्दाचा अर्थ अनेकदा मद्यपानाशी जोडला जातो आणि तेथेच प्रश्न निर्माण होतो. मद्यपान शरीरासाठी हितकारक आहे, अशा फोल दाव्यांवर समाजातील मोठा वर्ग विश्वास ठेवत नाही, ही समाधानाची बाब आहे. वैद्यकीय क्षेत्रातील काही मते किंवा संशोधनाचा संदर्भ देत मर्यादित मद्यपानाचे समर्थन केले जाते; पण सणाच्या उन्मादात 'मर्यादा' हा शब्द बहुतेकदा विसरला जातो. परिणामी अपघात, भांडणे, रस्त्यावर गोंधळ, महिलांशी गैरवर्तन अशा घटना वाढताना दिसतात. शासनाच्या धोरणांमध्येही विरोधाभास दिसतो. एका बाजूला दारूबंदीची चर्चा, तर दुसऱ्या बाजूला महसुलासाठी दारू विक्रीला प्रोत्साहन, ही दुहेरी भूमिका सर्वज्ञात आहे. राज्याच्या महसुलात मद्यविक्रीचा मोठा वाटा आहे, हे वास्तव नाकारता येत नाही. मात्र महसुलाच्या नावाखाली समाजावर होणाऱ्या दुष्परिणामांकडे डोळेझाक करणे योग्य ठरणार नाही. विशेषतः होळीसारख्या सणाच्या निमित्ताने 'विशेष परवानग्या' देण्याची मागणी होत असते. परंतु सण म्हणजे निर्बंधमुक्त उन्माद नव्हे; तो जबाबदारीची जाणीव ठेवून साजरा करायचा सामाजिक उत्सव आहे. धुलीवंदन हा रंगांचा खेळ असला तरी तो परस्पर संमतीचा असावा. कोणालाही जबरदस्तीने रंग लावणे, रस्त्यावरून जाणाऱ्या महिलांवर किंवा वयोवृद्धांवर रंगफेक करणे, वाहनचालकांना अडवणे, या कृतींना 'मस्ती' म्हणता येणार नाही. अनेकांना रंगांमुळे ॲलर्जीचा त्रास होतो, काही जण धार्मिक किंवा वैयक्तिक कारणांमुळे रंग खेळत नाहीत. त्यांच्या भूमिकेचा आदर करणे हीच खरी संस्कृती. बुरा न मानो होली है हा विनोदाचा भाग असला, तरी त्याचा गैरवापर होऊ नये. यंदाच्या धुलीवंदनाच्या निमित्ताने काही बाबी कटाक्षाने पाळणे आवश्यक आहे. जसे रासायनिक रंगांऐवजी नैसर्गिक, त्वचेला सुरक्षित रंगांचा वापर करावा, मद्यपान करून वाहन चालवणे टाळावे; अशा कृतींमुळे स्वतःचा आणि इतरांचा जीव धोक्यात येतो. पाण्याची उधळपट्टी टाळून पाण्याचे महत्त्व लक्षात घ्यावे. महिलांचा, मुलांचा आणि वयोवृद्धांचा सन्मान राखावा. सण साजरा करताना समाजातील प्रत्येक घटकाचा विचार करणे आवश्यक आहे. काही जणांसाठी होळी हा आनंदाचा दिवस असला, तरी काही कुटुंबे आर्थिक अडचणीत असतात. अशा वेळी दिखाऊ खर्च, पैशांची उधळण आणि मद्याच्या बाटल्यांवर होणारा खर्च पाहून विषमता अधिक प्रकर्षाने जाणवते. आनंद साजरा करण्यासाठी पैशांची होळी करण्याची गरज नाही; उलट समाजोपयोगी उपक्रम, सामूहिक स्वच्छता मोहीम, गरजूंना मदत अशा कृतींमधूनही सण अधिक अर्थपूर्ण होऊ शकतो. जिल्हा प्रशासन आणि पोलीस यंत्रणांनी कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी योग्य ती पावले उचलणे आवश्यक आहे. परंतु प्रत्येक गोष्टीसाठी प्रशासनाकडे बोट दाखवण्यापेक्षा नागरिकांनी स्वतःहून संयम बाळगणे अधिक महत्त्वाचे. सणाच्या दिवशी रुग्णालये, आपत्कालीन सेवा आणि सार्वजनिक वाहतूक सुरळीत राहिली पाहिजे, याची जाणीव सर्वांनी ठेवावी. या सणाचा खरा संदेश आहे की वाईट प्रवृत्तींचे दहन आणि चांगल्या विचारांचे स्वागत. धुलीवंदन म्हणजे रंगांच्या माध्यमातून नात्यांना नवी उब देणे. या सणात जर मद्यधुंद उन्माद, अपमानास्पद वर्तन आणि बेछूट खर्च यांनाच स्थान मिळाले, तर आपण सणाचा आत्माच हरवून बसू. म्हणूनच यंदा होळी आणि धुलीवंदन साजरे करताना एकच मंत्र लक्षात ठेवूया, आनंदात राहूया, पण इतरांना त्रास होणार नाही याची खबरदारी घेऊया. रंग उधळूया, पण जबाबदारीची जाण ठेवून. सण साजरा करण्याचा अधिकार प्रत्येकाला आहे; मात्र तो इतरांच्या अधिकारांवर गदा आणणारा ठरू नये, हीच खरी सामाजिक परिपक्वता.

# गावाकडचा शिमगा आणि धुळवड!



बालपणीचा काळ सुखाचा! म्हण आजही मनाला तेवढीच हर्षोल्हाषित करून जाते! लहानपण आठवलं की आतून बाहेरून गलबलून येतं! एकेक प्रसंग आणि सण समारंभाची आठवण झाली की; बालपण मोर पिसासारखं अलगद स्पर्शून जातं. बालपण खरंच खूपच सहज, आनंदी, निखळ सोज्वळ असतं. लहानपणीच्या एकेका सणाचे नाव निघाले की; जणू एक एक प्रसंग आणि एक एक क्षण जिवंत, जागा होतो. आज सकाळी आमची कृष्णा म्हणाली, पप्पा, आज होळी आहे आणि उद्या रंगपंचमी, तेव्हा मला तुम्ही भरपूर रंग आणून द्या. मी तिला हो म्हणालो आणि हळूच माझं वेडं मन गोजेगावाकडच्या लहानपणीच्या शिमगा आणि धुळवडीच्या दिवसात जाऊन रंगून आलं!

आमच्या घरी दोन खंड्या म्हणजे ४०-४२ गाई. दिवाळी संपली की गावातील गोठ्यातील गुरांची दावण हळूच शेतात ट्रान्सफर व्हायची. त्या दावणी बरोबर आम्हीही असायचो. आजही ते जागलीचे दिवस आठवले की; मन शांत, प्रशांत होतं. ती अंधारी रात्र. सगळीकडून किड्यांचा किर्र आवाज. घुबडाचं घुघ्रीघु. कोल्हे कोई. दुरून येणारा थंडगार वारा आणि आम्ही गायींच्या बाजूला जमिनीवर मातीचीच उशी करून, त्यावर खताच्या पिशवीचं चवाळ टाकून झोपलेलो. अंगावर जाडजूड गोधड्या, जशीजशी रात्र चढायची, तशी तशी थंडी पण वाढायची! असो.

पानगळीने शिमग्याची चाहूल लागायची. महिन्यावर शिमगा आला की आमची शिमग्याची तयारी सुरू व्हायची. दुपारी शाळा सुटली की शेतात जायचं. दावणीत पडलेलं गाईचं शेण घ्यायचं आणि चाकोल्या करायच्या. चाकोल्या म्हणजे दोन्ही हाताचे अंगठा आणि त्याच्या बाजूचे बोट एकत्र जोडून त्याच्यामध्ये शेण थापायचं. मस्त लव्हच्या चिन्हाचा आकार व्हायचा, ते तेव्हा आम्हाला कळत नव्हतं. मध्यभागी एक छिद्र पाडायचं आणि झालेली चाकोली उन्हात वाळू घालायची. अशा शंभर-दोनशे-तीनशे चाकोल्या मी आणि सुदादा करायचो. शिमग्याच्या दिवशी चाकोल्याचा माण असायचा. ज्याची माळ मोठी तो सगळ्यांच्या पुढ.

महिनाभर गावातलं सुताराच्या निह्यावरून, लोकांच्या गोठ्यातून, बायांच्या सरपनातून, एवढंच काय एखांद्याची बैलगाडीचे चाकं-दांडी चोरून जमा करायचे. याच्यात आम्ही सामील असायचो. एखाद्याचं कामाचं लाकूडही आणलं जायचं. शिमग्याच्या संध्याकाळी ही सगळी लाकडं मारुतीच्या पारापुढे गोळा व्हायची. दोन-चार पोरं जाऊन मोठाले एरंडाचे झाडं आणायचे. माणसं पहार-कुस्यानं खड्डा करून एरंडाचे झाड उभारायचे. लगेच पोरं चोरलेलं सरपण टाकायचे. ऐन शिमग्याच्या दिवशी बायायच्या गवऱ्याचे उडवे फोडून सगळा उडवाच होळीत आणून टाकायचा. ज्या बाईचा उडवा फुटला ती बाई जोरजोरात होळीच्या दिवशी शिमगा करायची! लोकं धम्माल हसायचे!

लाकडं टाकताना पोरं बोंबलू बोंबलू आचकट विचकट शिव्या द्यायची. पारापुढच्या घरातील लोकांचा पोरं उद्धार करायचे. वारीक, सरपंच, पाटील, मारवाडी यांच्या नावाच्या तर शिव्या ठरलेल्या होत्या. मारवाड्याला शिव्या दिल्यामुळे मारवाडी काठी घेऊन पोराच्या मागे लागायचा. पोर आणखी शिव्या द्यायची. पाटील, सरपंच मात्र गपचूप खाली मान घालून हसत हसत निघून जायचे! मग होळी पेटायची. दिवस माळवताना पोरं-पोरी आपापल्या चाकोल्याच्या माळा गळ्यात घालून यायचे. आमच्या गळ्यात लांब लांब माळा पाहून आमच्या नावाने पण शिव्याचा शिमगा व्हायचा. मग आम्ही गळ्यातली चाकोलीची माळ होळीत टाकायची, दर्शन घ्यायचं आणि पोरामध्ये सामील व्हायचं. शाळेच्या पलीकडून बाबू बुधाचं पोरगं दारूची कॅन घेऊन बसलेलं असायचं. पिणारे लोक हळूच शाळेच्या मागे जाऊन यायचे आणि पोरात सामील होऊन शिव्या देऊन जोरजोरात बोंबलायचे! पारापसी जोरात शिमगा सुरू व्हायचा. संध्याकाळी बाया पुरणपोळीचा निवद घेऊन होळीच्या भोवताल पाणी घालून हळदकुकू निवद वाहून निघून जायच्या. थोडावेळ बोंबला थांबायचा आणि एखादा माणूस दिसला की त्याचं नाव घेऊन पुन्हा शिव्या सुरु. असं रात्री नऊ-दहापर्यंत चालायचं. आम्ही घरी जायचो आणि दहानंतर पिदाड्यांचा शिमगा रातभर चालायचा.

दुसऱ्या दिवशी धुळवड असायची. तेव्हा रंग विकत आणले जात नसत. माळावरच्या पळसाचे फुलं भिजू घालून दुसऱ्या दिवशी पहाटेच पिळायचे. मस्त इको फ्रेंडली केशरी रंग तयार व्हायचा! आम्ही तो रंग खेळायचो. काही इपितर पोरं चिखल, गटारातली घाण माणसाच्या अंगावर टाकायचे. माणसं शिव्या देऊन पाठीमागे लागायची. कोणी कोणी तर गाडीचं वंगण तोंडाला लावायचे. मग भांडण व्हायचे. धूळवडीच्या दिवशी पाराच्या भोवताल रस्त्याने पिदाडे जोरजोरात शिव्या देत झुलत चालायचे! शिमग्याच्या अन धुळवडीच्या दिवशी शिव्या देऊन हे पिदाडे मोकळे व्हायचे! आम्ही पोरं पिदाडे झुलताना अन शिव्या देताना पाहून भलते हसायचो! लय मज्जा यायची!

तो काळ आणि ते दिवस मोठे मजेशीर होते. गावात गावपण होतं. शिव्या दिल्या तरीही दुसऱ्या दिवशी लोक सगळं विसरून जायचे. एकमेकांच्या कामी यायचे. कुणासोबतही कुणाचं वैर नसायचं. मनसोक्त, स्वच्छंदी जगणारा गाव कोपऱ्याकोपऱ्यात जिवंत होता. आज काळाबरोबर आम्ही बदललो आणि सण समारंभही बदलले. होळीच स्वरूपही बदललं. आज गावाकडे कोणी चाकोल्या करत नाही. कोणी लाकडांची चोरी करत नाही. मुलं आता पहिल्यासारखे बोंबलतही नाहीत आणि शिव्याही देत नाहीत. बोंबलणारा, शिव्या देणारा, लाकूडफाटा, गवऱ्या चोरणारा तो गाव जिवंत होता. आता गावात पोरं राहिली नाहीत आणि आहेत ते मोबाईलशिवाय त्यांना दुसरं काही सुचत नाही. गावात छोटीशी होळी होते पण त्या होळीत कुणीही प्रेमाच्या आकाराच्या चाकोल्या टाकत नाही. चारपाचशे गायींचे गायगवार आता नाही. एखाद्या घरी गाय आहे. घरोघरचे बैल आणि औत गायब झालेत. गाव आता शिमग्याच्या शिव्या विसरलाय. गावात होळी आणि पुरणपोळीचा आस्वाद शहरी झालाय. पळसाच्या फुलापासून कुणीही रंग तयार करत नाही. आज मीडियावर इको फ्रेंडली होळी म्हणणारे लोक आणि तेव्हाची गावाकडची होळी ही खऱ्या अर्थाने इको फ्रेंडली होती. आज केमिकलचे रंग आले, त्यामुळे त्वचेला इन्फेक्शन होत आहे. एवढेच काय रंग खेळण्यासाठी आज माणसं घराबाहेर पडत नाहीत. घरच्या घरी गालाला दोन बोट लावून, सेल्फी काढून स्टेटसला आणि मीडियावर टाकून माणसं मोकळे होत आहेत. माणसाच्या जीवनातील रंग कमी झालाय. रंग खेळायला माणूस तेवढा स्वच्छंदी, मोकळा आणि रंगीन असायला हवा! जिवंतपणा हीच खरी निसर्ग-ईश्वरी नशा! रंग खेळण्यासाठी नशा घ्यायची गरज नाही, परंतु रंग खेळणे हीच एक नशा आहे हे तो विसरलाय! आजच्या दिवशी एखाद्या गाण्यावर मनसोक्त नाचणे, रंगपंचमीच्या एकमेकांना रंग लावून शुभेच्छा देणे आणि जीवनाला सुखदुःखाच्या रंगाने रंगारंग करणे हाच एक संदेश देणे अपेक्षित असते!

तेव्हा चला मित्रहो, आपणही कोणतेही नशा-व्यसन न करता आनंद, उत्साह, प्रेमाचे रंग एकमेकांमध्ये वाटूया आणि एकमेकांना कोणताही त्रास होणार नाही असे रंग लावून जात-धर्म-पंथ-लिंग इत्यादी अमानवी रंग संपवून टाकत आणि मोठ्या उत्साहात, आनंदाने रंगपंचमी-धुळवड खेळूया! सर्वांना रंगपंचमीच्या हार्दिक शुभेच्छा!


**-प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये**
कै. रमेश वरपूडकर
महाविद्यालय, सोनपेठ, जि. परभणी
मो. ९१५८०६४०६८

# डॉ. जे. एम. वाघमारे : शिक्षण, प्रबोधन आणि परिवर्तनाचे ध्यासपर्व

डॉ. जनार्दन वाघमारे हे एक कल्पक शिक्षणमहर्षी, उत्कृष्ट प्राचार्य, प्रशासक आणि पुरोगामी विचारवंत म्हणून सर्वपरिचित आहेत. त्यांचा जन्म औसा तालुक्यातील कौठा (जि. लातूर) या मराठवाड्यातील मागास खेड्यात एका शेतकरी कुटुंबात झाला. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून शिक्षण घेत त्यांनी आपला जीवनप्रवास इंग्रजी शिक्षक म्हणून सुरू केला.

पुढे राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूरचे पहिले प्राचार्य, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे संस्थापक कुलगुरू, लातूर नगरपालिकेचे पहिले लोकनियुक्त नगराध्यक्ष, राज्यसभेचे माजी खासदार, बहुभाषिक लेखक, साहित्यिक अशा विविधांगी भूमिका निभावत यशाची शिखरे गाठली. प्रख्यात अमेरिकन लेखक रिचर्ड सेंट जॉन यांनी आपल्या Eight Principles of Success या ग्रंथात यशाची अष्टसूत्री सांगितलेली आहे. यशस्वी व्यक्तीमध्ये आढळणाऱ्या झपाटलेपणा (passion), काम (work), केंद्रीत लक्ष (focus), कल्पकता (ideas), चिकाटी (persistance) आदी गुणवैशिष्ट्यांचा सुरेख संगम सरांच्या उत्तुंग व्यक्तिमत्त्वात प्रतित होतो. डॉ. वाघमारे सरांनी प्राध्यापक, प्राचार्य, कुलगुरू या भूमिकेतून भारतीय शिक्षणपद्धतीवर मूलभूत चिंतन व लेखन केले आहे. महाराष्ट्रात सर्वत्र गाजलेल्या लातूर पॅटर्नची निर्मिती त्यांच्याच नेतृत्वाखाली झाली.

आजतागायत त्यांनी शिक्षण, भाषा व साहित्य, इतिहास, राजकारण, तत्त्वज्ञान आदी



समकालीन सामाजिक-राजकीय, प्रश्नांवर सुमारे ८० ग्रंथ आणि असंख्य लेख लिहिले आहेत. त्यांच्या प्रमुख ग्रंथामध्ये अमेरिकन निग्रो : साहित्य आणि संस्कृती (१९७८), महाराष्ट्रातील राजकारण आणि समाजकारण (१९८०), आजचे शिक्षण : स्वप्न आणि वास्तव (१९९३), चिंतन एका कुलगुरूचे (१९९९), द क्रेस्ट फॉर ब्लॅक आयडेंटिटी (२००२), मूठभर माती (आत्मचरित्र,२००६), शरद पवार : व्यक्तित्व, कर्तृत्व आणि नेतृत्व (२०१६), माय डेज इन पार्लमेंट (२०१७), साहित्य: प्रबोधन आणि परिवर्तन (२०२२) इंडिया इन सर्च ऑफ ए नेशन (२०२४) आदींचा अंतर्भाव होतो. त्यांच्या लेखन आणि व्याख्यानातून भारतीय संविधानातील लोकशाही मूल्ये आणि फुले-शाहू-आंबेडकरी विचारधारेप्रती असलेली त्यांची अतूट बांधिलकी दिसून येते.

डॉ. वाघमारे सरांनी लातूरमधील राजर्षी शाहू महाविद्यालयाचा कायापालट केला. त्यांच्या दूरदृष्टीमुळे आणि प्रशासकीय कौशल्यामुळे महाराष्ट्रात 'लातूर पॅटर्न'चा उदय झाला. त्यामुळे वैद्यकीय आणि अभियांत्रिकी प्रवेश परीक्षेत हाविद्यालयाला अभूतपूर्व यश मिळाले. त्यांनी मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबादला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव देण्यासाठी सुरू झालेल्या नंतर चळवळीत मोलाची भूमिका बजावली. नामांतर चळवळीचे समर्थक आणि विरोधक यांच्यात समन्वय साधत मराठवाडा विद्यापीठाच्या नामविस्ताराबरोबर नांदेड येथे स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाची स्थापना करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. पहिले कुलगुरू म्हणूनही त्यांनी उल्लेखनीय कामगिरी केली. 'कॅम्पस स्कूल सिस्टीम', कॉपी मुक्ती अभियान, ए.टी.के.टी यासारख्या अनेक नाविन्यपूर्ण उपक्रम आणि नवनवीन कोर्सेस सुरू करण्यात पुढाकार घेतला.

त्यांच्या मूलगामी कार्याची दखल घेऊन महाराष्ट्र शासनाने त्यांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर दलित मित्र पुरस्कार देऊन सन्मानित केलेले आहे. त्यांनी केलेले शैक्षणिक प्रयोग, घेतलेल्या साहित्यिक भूमिका, सामाजिक -सांस्कृतिक कार्य आणि राजकीय क्षेत्रातील कामगिरी महत्त्वपूर्ण आहे. महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या क्रियाशील विचारांचा वारसा जोपासत समाजप्रबोधन आणि परिवर्तनाच्या चळवळीस वाहून घेतलेले आहे. शिक्षण, प्रबोधन आणि परिवर्तन या क्षेत्रातील एका उत्तुंग व्यक्तिमत्वाची,त्यांच्या अतुलनीय कार्याची दखल घेत त्यांना अनेक पुरस्कार ही मिळालेले आहेत. सरांच्या जाण्याने महाराष्ट्राच्या शैक्षणिक, साहित्यिक, परिवर्तनवादी, राजकीय विचारविश्वात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. सरांच्या पावन स्मृती, मूलगामी विचार आणि युगप्रवर्तक कार्यास विनम्र आदरांजली!

**-प्रा. डॉ. ज्ञानेश्वर डिगोळे**
पदव्युत्तर इंग्रजी विभाग,
पीपल्स कॉलेज, नांदेड
मो. ९९६०१६१३७५

# जागतिक वन्यजीव दिन



आज ३ मार्च, आजचा दिवस संपूर्ण जगात जागतिक वन्यजीव दिन म्हणून साजरा केला जातो. वन्यजीवांची शिकार थांबवून वन्यजीव प्रजातींचे संवर्धन करणे हा या दिनामागिल मुख्य उद्देश आहे. १९७० च्या सुमाराला वन्यजीवांची शिकार, त्यांची तस्करी याचे प्रमाण वाढू लागले होते. हे प्रमाण इतके वाढले की त्यापैकी बरेचसे वन्यजीव कायमचे नष्ट होतात की काय अशी परिस्थिती निर्माण झाली. याबाबत जागृती करण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघाने ( युनो ) वन्यजीव दिवस साजरा करण्याचे ठरवले. यादिवशी वन्यजीवांचे रक्षण त्यांचे संवर्धन आणि निसर्ग साखळीतील त्यांचे महत्व आदी विषयांवर जनजागृतीचे कार्यक्रम केले जातात. नामशेष होण्याच्या धोका असलेल्या वन्य सृष्टीच्या आंतरराष्ट्रीय व्यापारावर बंधन आणणारा कायदा ३ मार्च १९७३ रोजी ८० देशांनी मान्य केला म्हणून या दिवसाला महत्व आहे.

वन्यजीवांची शिकार तसेच त्यांच्या आणि दुर्मिळ वनस्पतींचा चोरटा व्यापार ही मोठी समस्या बनली आहे. केवळ भारतातच नाही तर जगभरात ही मोठी समस्या बनली आहे. एककिडे जंगले कमी होत आहे तर दुसरीकडे शिकार आणि तस्करीमुळे वन्यजीव नामशेष होत आहे. निसर्गाच्या समृद्ध परंपरेचा केंद्रबिंदू म्हणजे वन्यजीव. बंगालचे वाघ, आशियातील एकशिंगी गेंडे, भारतीय मोर आणि अशा इतर वैशिष्ट्यपूर्ण वन्यजीवांचे सुरक्षित वसतिस्थान म्हणजे जंगल. पण आता याच जंगलावर मानवाने अतिक्रमण केल्याने या वन्यजीवांच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे. हत्ती, गेंडा आणि वाघ हे जंगलातील मुख्य वन्यजीव आहेत. निसर्ग साखळीत या वन्यजीवांचे महत्व अनन्यसाधारण आहे पण हस्तिदंत, गेंड्याचे शिंग आणि वाघाच्या शरीरातील विविध अवयव यांच्या चोरट्या व्यापाराचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चालले आहे. जगभरात या व्यापारातून दरवर्षी ३५ हजार ते ७० हजार कोटी रुपयांची उलाढाल होत असल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. गेल्या ४० वर्षात जगभरातील अर्धे वन्यजीवन धोक्यात आले आहे.

वन्यजीवांचा अधिवास धोक्यात येणे, वन्यजीवांची शिकार त्यांची तस्करी अशा अनेक कारणाने वन्यजीवांची संख्या कमालीची घटली आहे. हस्तिदंतासाठी आजवर १ लाख आफ्रिकन हत्ती शिकार झाले आहेत. खवले मांजर हा जगातील सर्वाधिक मारला जाणारा सस्तन प्राणी ठरला आहे. मागील दहा वर्षात गेंड्याच्या शिकारीत कैक पटीने वाढ झाली आहे.

वन्यजीवांच्या तस्करीमुळे कायदा आणि सुरक्षा व्यवस्था, गुन्हेगारी टोळ्यांचा निधी यासारखे प्रश्न उपस्थित होऊ लागले आहे. वन्यजीवांची शिकार तसेच त्यांच्या आणि दुर्मिळ वनस्पतींचा चोरटा व्यापार स्थानिकांच्या मदतीशिवाय होणे शक्य नाही. त्यामुळे असे होऊ नये यासाठी त्यांचे प्रबोधन होणे गरजेचे आहे. निसर्गाच्या साखळीतील प्रत्येक घटक किड्यांपासून ते हत्तीपर्यंत पृथ्वीवरील जीवसृष्टीसाठी महत्वाचा आहे. ही बाब सर्वांनी ध्यानात घेतली पाहिजे.

जगातील एकूण लोकसंख्येपैकी ३० टक्के लोकसंख्या तरुण आहे. विशेष म्हणजे भारताच्या एकूण लोकसंख्येपैकी ६० टक्के लोकसंख्या तरुण आहे. म्हणून वन्यजीव संरक्षण व संवर्धन करण्यात तरुणांचा सहभाग अतिशय महत्वाचा आहे. तरुणांना वन आणि वन्यजीवांचे महत्व समजावून सांगावे त्यासाठी शाळा कॉलेजमध्ये जाऊन त्यांचे प्रबोधन करावे. तरुणांच्या हातात त्या त्या देशाचे भविष्यच नसून जगभरातील सर्व वन्यजीवांच भविष्य त्यांच्याच हाती आहे. सरकारनेही वन्यजीवांची शिकार करणारे व त्यांची तस्करी करणाऱ्यांवर कडक कारवाई करावी. जंगलतोड होऊ नये यासाठी उपाय योजावेत. वन्यजीवांचे संरक्षण करणे ही आपली जबाबदारी नसून कर्तव्य आहे.

**-श्याम बसप्पा ठाणेदार**
दौंड, जि. पुणे

# अंधश्रद्धामुक्त विज्ञानवाद हीच आनंदी जीवनाची गुरुकिल्ली -शिवाजीराजे पाटील




**नांदेड (प्रतिनिधी)**– शब्दप्रामाण्य, ग्रंथप्रामाण्य किंवा व्यक्तीप्रामाण्यापोटी केवळ परंपरेने पूर्वापार चालत आलेल्या रुढी व काल्पनिक कालबाह्य बाबींवर क्रमित केलेल्या जीवनापेक्षा वैज्ञानिक आचार-विचार व तर्कसंगत बुध्दीने क्रमित केलेले जीवन अधिक आनंदी व समाधानी ठरू शकते. दैववादापेक्षा प्रयत्नवाद अधिक लाभदायक ठरतो. त्यामुळे आजच्या जीवनात विज्ञान, संत विचार व कृतीशील महामानवांच्या विचारांची गरज तरुणाईला आहे, असे परखड मत शिवाजीराजे पाटील यांनी व्यक्त केले. श्री गुरु गोविंदसिंग गव्हर्मेंट आयटीआय कॉलेज येथे राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त आयोजित विज्ञानप्रदर्शनी व बक्षीस वितरण सोहळ्यात विज्ञानातील महिला – विकसित भारताची प्रेरक शक्ती या विषयावर आधारित करिअर मार्गदर्शन शिबिराचे प्रमुख वक्ते म्हणून इंजि. शिवाजीराजे पाटील बाभळीकर बोलत होते.

उपप्राचार्य विश्वंभर कंदलवाड यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या कौशल्याधारित शिक्षण व तांत्रिक प्रगतीची गरज आणि प्रेरणादायी संदेश व नवकल्पनांना प्रोत्साहन या विषयांवरील सुप्रसिद्ध समुपदेशक शिवाजीराजे पाटील यांच्या व्याख्यानासाठी महाराष्ट्र शासन निर्देशित आयएमसी मेंबर इंजि. धीरज बिडवे, प्रा. मोहन कलंबरकर, कार्यालयीन अधीक्षक वसंत सोनकांबळे, प्रा. साईनाथ खानजोडे, पुनम सदावर्ते, विवेक बोंडलवार आदी मान्यवर उपस्थित होते.

नोबल पारितोषिक विजेते शास्त्रज्ञ भारतरत्न सर डॉ. सी. व्ही. रमण यांचे प्रतिमापूजन व दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाला सुरुवात झाली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. मनीषा हिसवनकर यांनी केले तर प्रा. दिनेश पोतदार यांनी सूत्रसंचलन आणि शेवटी उपस्थितांचे आभार विनोद घोसले यांनी मानले.

## धनगरवाडी येथे जल अर्पण दिवस साजरा

**नांदेड (प्रतिनिधी)**–नांदेड तालुक्सयातील धनगरवाडी येथे जल अर्पण दिवस उत्साहात साजरा करण्यात आला.

गावकऱ्यांच्या सकारात्मक सहकार्याच्या दृष्टिकोनातून जल जीवन मिशनच्या 'हर घर, नल से जल' योजनेतून गावातील पाणी पुरवठा योजना यशस्वी करण्यात तरूणाईचे मोठे योगदान आहे. भविष्यात ही योजना दीर्घकाळ टिकून राहण्यासाठी वितरण वाहिनी सुरक्षित ठेवण्याच्या दृष्टीने गावकऱ्यांनी पावले उचलली आहेत. गावात जलजीवन मिशनने उभारलेल्या पाणीपुरवठा ताब्यात घेऊन यशस्वीपणे चालवावी व गावची पाण्याची तहान भागवावी, असे आवाहन कार्यकारी अभियंता राहूल रावसाहेब, जल जीवन मिशनचे प्रकल्प संचालक मयूरकुमार आंदेलवाड यांनी केले आहे.

धनगरवाडी ग्रामपंचायतमध्ये जल जीवन मिशन अंतर्गत पाणीपुरवठा योजनेचे काम पूर्ण करण्यात आले आहे. गावातील प्रत्येक कुटुंबाला नळाद्वारे शुद्ध पाणी मिळत आहे. पाणी पुरवठा योजना गावाला हस्तांतरण दिवस, जल अर्पण दिवस आज विविध उपक्रम राबवून ग्रामस्थांनी उत्साहात साजरा केला.

## ६४ व्या महाराष्ट्र राज्य हिंदी नाट्य स्पर्धेत 'वसुदेव कुटुंबकम' नाटकाचे पुणे येथे सादरीकरण



**नांदेड (प्रतिनिधी)**– तन्मय ग्रुप नांदेडतर्फे ६४ व्या महाराष्ट्र राज्य हिंदी नाट्य स्पर्धेमध्ये 'वसुधैव कुटुंबकम' या नाटकाचे सादरीकरण पंडित जवाहरलाल नेहरू सांस्कृतिक भवन ढोले रस्ता पुणे येथे नुकतेच झाले.

या नाटकाचे लेखक आणि दिग्दर्शक डॉ. जगन्नाथ (नाथा) चितळे यांनी केले. सदरील नाट्य स्पर्धा अत्यंत रोमांचक स्थितीमध्ये आलेली आहे. महाराष्ट्र शासन ६४ व्या महाराष्ट्र राज्य हिंदी नाट्य स्पर्धेत नांदेडतर्फे 'वसुधैव कुटुंबकम' नाटक अतिशय दर्जेदारपणे सादर करण्यात आले. पौराणिक हिंदी भाषा, उत्कृष्ठ अभिनय, उत्कृष्ठ नेपथ्य, उत्कृष्ठ प्रकाश योजना आणि अप्रतिम दिग्दर्शन याच्या जोरावर हे नाटक स्पर्धेत उतरेल अशा प्रकारचे सादरीकरण नांदेडच्या चमूने केले आहे.

या नाटकामध्ये सुरभी होसूर, नागेश रोकडे, अभिजीत बारडकर, आदित्य उदावंत, कु. रिया पावडे, कु. श्वेता सौदे, कु. स्वीटी सोनटक्के, अनुराधा पांडे-तांबोळी, अक्षद चंद्रवंशी, वैभव देशमुख, प्रणव चौसाळकर, सुनील कौठेकर, गुलाबराव पावडे, विवेक भोगले, डॉ. जगन्नाथ (नाथा) चितळे, कु. अस्मिता परांजपे, कु. समिधा कौठेकर, कु. ऋनिता गोवंडे, कु.नेहा हापगुंडे, कु. मानसी चौधरी, कु. सान्वी चौधरी, कु. संजीवनी शिंदे, गणेश हंबर्डे, अधिराज जालनेकर, भावेश तिडके, आयुष गावंडे, गिरीश रघुजीवार, श्रेयस यादव, हर्षवर्धन काळम पाटील, राजेश कैरम कोंडा, हरीओम कल्याणकर, ऋषिकेश कल्याणकर, अरुण सांडगे, आकाश पांचाळ, हर्षल तेजनकर, ऋतिक पुंडे, चिंतन मोरे, अथर्व परपटे, वेदांत कोरणे, वैभव राठोड, रोहित जोंधळे, अनिकेत पाटील, प्रशुल धुळे, पार्थ लोणे, व्यंकटेश कदम, राहुल भगत, श्रीकांत पाटील, आशिष चितळे, प्रमोद कुलकर्णी या कलाकारांनी आपल्या भूमिका बजावल्या.

## गोदावरी इंटरनॅशनल पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांची सायन्स कॉलेज प्रयोग शाळेला भेट



**नांदेड (प्रतिनिधी)**– येथील गोदावरी इंटरनॅशनल पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी सायन्स कॉलेजमधील प्रयोग शाळेला भेट दिली.

विस्तारित शिक्षण कार्यक्रमाचा भाग म्हणून विद्यार्थ्यांना प्रयोग शाळेत नेण्यात आले. या दौऱ्यात संमिश्र प्रयोगशाळा, जीवशास्त्र प्रयोगशाळा, भौतिकशास्त्र प्रयोगशाळा आणि रसायनशास्त्र प्रयोगशाळा यांचा समावेश होता. ज्यामुळे वैज्ञानिक संशोधनाच्या जगाची व्यापक ओळख झाली. या भेटीचा उद्देश उत्सुकता जागृत करणे आणि वर्गात शिकणाऱ्या सैद्धांतिक संकल्पनांची प्रत्यक्ष समज वाढवणे हा होता, असे मत उपस्थित शिक्षकांनी व्यक्त केले.

जीवशास्त्र प्रयोगशाळेत सूक्ष्मदर्शकाखाली नमुने पाहण्यापासून ते भौतिकशास्त्र प्रयोगशाळेत गती आणि विजेच्या नियमांचा शोध घेण्यापर्यंत विज्ञानाच्या वास्तविक जीवनातील अनुप्रयोगांचे साक्षीदार झाले. रसायनशास्त्र प्रयोगशाळेने त्यांना रासायनिक अभिक्रियांशी संबंधित अनेक प्रयोगांनी मोहित केले, तर संमिश्र प्रयोगशाळेने त्यांना मूलभूत वैज्ञानिक साधने आणि आंतरविद्याशाखीय क्रियाकलापांच्या मिश्रणाची ओळख करून दिली.

यावेळी देवाशिष पौळ, प्राचार्य नितीन हटकर,पर्यवेक्षक प्रल्हाद शिंदे,प्रा.संदीप पावडे, मोनिका स्वामी, प्राजक्ता उपरे, प्रवीण बोबडे, माया बिजले आदी उपस्थित होते.

## परशुराम आर्थिक विकास महामंडळाच्या कर्ज योजनांची अंमलबजावणी सुरू

### लाभ घेण्याचे निखिल लातूरकर यांचे आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी)**– परशुराम आर्थिक विकास महामंडळातर्फे जाहीर करण्यात आलेल्या वैयक्तिक कर्ज योजना व गट कर्ज योजनेची अंमलबजावणी औपचारिकरित्या सुरू करण्यात आली आहे. लाभार्थ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन अ. भा. ब्राह्मण महासंघाचे प्रदेशाध्यक्ष निखिल लातूरकर यांनी केले आहे.

आर्थिकदृष्ट्या स्वावलंबन साधण्यासाठी इच्छुक लाभार्थ्यांना भांडवली मदत उपलब्ध करून देणे हा या योजनांचा मुख्य उद्देश असून, राज्यातील पात्र घटकांसाठी ही महत्त्वपूर्ण संधी ठरणार आहे. या योजनांचा लाभ घेण्यासाठी अर्ज वितरण प्रक्रियेलाही प्रारंभ करण्यात आला आहे. यानिमित्ताने महामंडळाच्या पुणे येथील कार्यालयात पहिल्या अर्जदार म्हणून अमेय असलेकर यांना महामंडळाचे अध्यक्ष आशिष दामले व व्यवस्थापकीय संचालक तुषार ठोंबरे यांच्या उपस्थितीत अर्ज तसेच योजनांचे माहितीपत्रक प्रदान करण्यात आले.

महामंडळामार्फत राबविण्यात येत असलेल्या वैयक्तिक व गट कर्ज योजनांमुळे स्वयंरोजगार, लघुउद्योग व उत्पन्नवाढीच्या संधी निर्माण होण्यास चालना मिळणार असून, समाजातील अधिकाधिक पात्र लाभार्थ्यांनी या योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन अध्यक्ष आशिष दामले यांनी केले. सदर योजनांसाठीचे अर्ज महामंडळाच्या संबंधित कार्यालयांमध्ये उपलब्ध करून देण्यात आले असून, ते परशुराम आर्थिक विकास महामंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावरही उपलब्ध आहेत. इच्छुक लाभार्थ्यांनी https://pavm.maharashtra.gov.in/योजना/ या संकेतस्थळाला भेट देऊन अर्ज डाउनलोड करावेत किंवा जवळच्या कार्यालयाशी संपर्क साधून अर्ज सादर करावेत, असे महामंडळामार्फत कळविण्यात आले आहे.

## 'नेसुबोस' महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची नाशिक पोलीस प्रशिक्षण केंद्रास भेट



**नांदेड (प्रतिनिधी)**– येथील नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक सहल नुकतीच पार पडली. या सहलीतील सहभागी विद्यार्थ्यांनी नाशिक येथील पोलीस प्रशिक्षण केंद्रास भेट देऊन सविस्तर माहिती जाणून घेतली.

अभिनव भारत शिक्षण संस्था संचलित नेताजी सुभाषचंद्र बोस कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाची दरवर्षीप्रमाणे काढण्यात येणारी शैक्षणिक सहल ही यावर्षी महाराष्ट्र पोलीस प्रशिक्षण केंद्र, नाशिक या ठिकाणी आयोजित करण्यात आली होती. नवीन शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने ही सहल विद्यार्थ्यांच्या भविष्यातील शैक्षणिक प्रगतीकरिता अत्यंत साह्यभूत ठरणार आहे. या शैक्षणिक सहलीचे नेतृत्व महाविद्यालयाच्या उपप्राचार्य व राज्यशास्त्र विभागातील प्रा. डॉ. कल्पना कदम यांनी केले होते.

या शैक्षणिक सहली दरम्यान नाशिक येथील पोलीस प्रशिक्षण केंद्रात मार्फत राबविण्यात येणाऱ्या व महाराष्ट्रातील पोलीस प्रशासनामार्फत पोलीस अधिकाऱ्यांना देण्यात येणाऱ्या प्रशिक्षणाची माहिती विद्यार्थ्यांना करून देण्यात आली. या प्रशिक्षण केंद्रातील अत्याधुनिक प्रशिक्षणाच्या यंत्रणा, प्रशिक्षण केंद्राचा इतिहास, प्रशिक्षण केंद्रात देण्यात येणाऱ्या शस्त्रास्त्रांची प्रशिक्षणविषयक माहिती व या पोलीस प्रशिक्षण केंद्राचा इतिहास या संदर्भातील सविस्तर माहिती ही सहलीतील सहभागी विद्यार्थ्यांना नाशिक पोलीस प्रशिक्षण केंद्राचे प्रमुख समपुदेशक संतोष गायके व तेथील पोलीस उपाधीक्षक संजय साळुंखे यांनी करून दिली.

या शैक्षणिक सहली दरम्यान महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी पोलीस प्रशिक्षण केंद्रामध्ये सर्व परिसर फिरून इत्थंभूत माहिती घेतली. या शैक्षणिक सहली दरम्यान ऐतिहासिक अशा काळाराम मंदिर, त्रिंबकेश्वर मंदिर तसेच सह्याद्री ॲग्रो फार्म यांसारख्या मोठ्या कृषीविषयक सामूहिक शेतीचा उपक्रम राबवणाऱ्या उपक्रमाची माहिती विद्यार्थ्यांना करून देण्यात आली. या शैक्षणिक सहलीच्या यशस्वीतेकरिता महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रा. डॉ. एस. बी. फड तसेच या सहलीचे समन्वयक म्हणून लोकप्रशासन विभागातील प्रा. डॉ. विजय तरोडे, हिंदी विभागातील प्रा. डॉ. देविदास येळणे, इतिहास विभागातील प्रा. डॉ. अश्विनी खांडेकर व प्रा. डॉ. शीतल सावंत यांनी अत्यंत महत्त्वाची भूमिका पार पाडली. या शैक्षणिक सहलहकरिता महाविद्यालयातील एकूण ४० विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग नोंदविला.

## राजश्री पब्लिक स्कूलमध्ये मराठी भाषा गौरव दिन उत्साहात साजरा



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)**– राजश्री पब्लिक स्कूल लातूर रोड, नांदेड येथे कविवर्य कुसुमाग्रज यांचा जन्मदिवस मराठी भाषा गौरव दिन म्हणून साजरा करण्यात आला.

यावेळी व्यवस्थापक सुशांत पाटील, प्राचार्य ज्ञानोबा मुंढे यांच्या हस्ते कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी संस्थेचे सचिव दिलीप पाटील, संचालिका डॉ. कल्पना पाटील, अनुराग पाटील, धनश्री तोरणेकर, अश्विनी देशमुख, मंदार खोसे, सुबोध पाटील, संगीता सोनके, प्रेरणा कांदे, राजू कळसे, सारिका कल्याणकर व सर्व शिक्षकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

यावेळी मराठी विषय शिक्षक मोहन जाधव यांनी मराठी भाषेचे महत्त्व सांगत 'लीळाचरित्र', 'विवेकसिंधू' ज्ञानेश्वरीसह कुसुमाग्रजांनी साहित्य क्षेत्रातील कादंबरीकार, नाटककार, कथाकार, कवी आणि समीक्षक म्हणून केलेल्या कार्याची माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सिद्धी तोरणेकर व विशाखा कटकदवणे या विद्यार्थिनींनी केले तर आभार जॉन सूर्यवंशी यांनी मानले.

## भारत सरकारच्या सहसचिव निधी पांडे यांनी दिली बिलोली येथील कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयाला भेट

**बिलोली (प्रतिनिधी)**– भारत सरकारच्या सहसचिव निधी पांडे यांनी बिलोली शहरातील कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयाला भेट देऊन पाहणी केली. यावेळी विद्यालयातील सोई-सुविधांचा आढावा घेऊन समाधान व्यक्त केले. त्यांच्यासमवेत उपमुख्यकार्यकारी अधिकारी राजकुमार मुक्कावार, शिक्षणाधिकारी प्राथमिक वंदना फुटाणे, शिक्षणाधिकारी माध्यमिक माधव सलगर आदींची उपस्थिती होती.



यावेळी सर्वप्रथम विद्यालयातील गाईड पथकाद्वारे गाईड संचलन व लेझीम पथकाद्वारे सलामी देऊन निधी पांडे यांचे स्वागत करण्यात आले. यानंतर विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ. गजरा सावळे व शिक्षिका सौ. अश्विनी कोतवाड यांनी शाळेतील सर्वसमावेशक उपक्रम, स्पर्धा याविषयी पीपीटीद्वारे सादरीकरण केले. विद्यार्थिनींनी विभागस्तरावर भूमिका सादर करून अभिनय स्पर्धेत द्वितीय क्रमांक प्राप्त केलेल्या नाटिकेचे सादरीकरण केले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देण्यात आले. जिल्हा स्काऊट गाईड मेळाव्यामध्ये प्राप्त स्मृती चिन्ह व प्रशस्तीपत्र देण्यात आले. विद्यार्थिनींचे सादरीकरण व सक्रिय सहभाग पाहुन निधी यांनी विद्यार्थिनींचा सत्कार केला व कलादालनामध्ये बनविलेले कागदकाम, चित्र रेखाटन, विविध विषयाचे प्रकल्प याची पाहणी करून विद्यार्थिनींचे कौतुक केले.

तसेच विज्ञान प्रयोगशाळा व नाविन्यपूर्ण विज्ञान केंद्रातील प्रयोगाची विद्यार्थिनींनी माहिती सांगितली. यावेळी शिक्षणाधिकारी दिलीप बनसोडे, पाचंगे, विद्यालयाचे अध्यक्ष तथा तहसीलदार गजानन शिंदे, विद्यालयाचे सचिव तथा गटशिक्षणाधिकारी बालाजी पाटील, मिठ्ठेवाड, जिल्हा समन्वयक सौ. सविता अवातिरक, केंद्रप्रमुख जयवंत काळे, मुख्याध्यापिका सौ. गजरा सावळे, शिक्षिका सौ. कोतवाड, सौ. लांब, सौ. गायकवाड, शिक्षक रेड्डी, पवार, गामेवाड, लेखापाल दुधमल, सौ. ढवळे, रायबोले आदींची उपस्थिती होती.

## नाळेश्वर येथील यशवंत माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी एनएमएमएस परीक्षेत मिळवले यश



**नांदेड (प्रतिनिधी)**– महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांनी नुकतेच जाहीर केलेल्या राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक मेरिट शिष्यवृत्ती योजना (एनएमएमएस) २०२५-२६ परीक्षेच्या निकालात नांदेड जिल्ह्यातील नाळेश्वर येथील यशवंत माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी यश संपादन केले आहे.

या परीक्षेत एकूण १८० गुणांपैकी सर्वोच्च १३० गुण मिळवून श्रुती अमृत डाखोरे हिने शाळेत प्रथम क्रमांक पटकावला. दुसऱ्या क्रमांकावर समृद्धी बळीराम डाखोरे (११६ गुण), तर तिसऱ्या क्रमांकावर निखिल तुकाराम वाघोळे (११२ गुण) यश संपादन केले आहे.

या परीक्षेत उत्तीर्ण विद्यार्थ्यांची यादी पुढीलप्रमाणे- डाखोरे श्रुती अमृत – १३०, डाखोरे समृद्धी बळीराम – ११६, वाघोळे निखिल तुकाराम – ११२, वाघ दीपाली गजानन – १११, डाखोरे श्रावणी अर्जुन – १०६, चपाट राशी रामराव – १०५, नाईक प्रथमेश शेषराव – १०३, वाघोळे समृद्धी युवराज –१०१, डाखोरे वेदिका मारुती – ९९, चपाट प्रगती गोविंद – ९६, वाघ राशी चांदू – ९५, गोभाडे सपना नागोराव – ९३, चपाट जीविका बाबाराव – ९३, तमलुरे ओमकार शिवराम – ९२, चपाट दिव्या दत्ता – ९१, शंकपाळे साक्षी यादव – ८९, जाधव अभय श्रीधर – ८९, डाखोरे शिवराज सुदाम – ८६, डाखोरे सौंदर्या माधवराव – ७६, सूर्यवंशी बायसा गंगाधर – ७५, भारती मयुरी माधव – ७४, धूतराज आदर्श मुंजाजी – ७३, वाघोळे वंशिका अंबाजी – ७२, सरोदे राहुल जितेंद्र – ६९, वाघोळे श्रद्धा सत्यनारायण – ६० यांचा समावेश आहे.

या यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष रंगनाथराव वाघ, सर्व संचालक मंडळ, शाळेचे मुख्याध्यापक आणि संपूर्ण शिक्षकवृंद यांनी अभिनंदन केले.

## विकसित भारतात महिलांचे योगदान अतुलनीय -डॉ. अरुणा शुक्ला

### इंदिरा गांधी महाविद्यालयात विज्ञान दिवस उत्साहात साजरा

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)**– आज जगात सर्वच क्षेत्रात महिलांनी आपल्या कर्तबगारीने नाव उंचावले आहे. विशेषतः विकसित भारतात महिलांचे योगदान तर अतिशय अतुलनीय आहे, असे प्रतिपादन अभ्यासक आणि विज्ञान महाविद्यालय नांदेड येथील उपप्राचार्य डॉ. अरुणा शुक्ला यांनी केले.

श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी संचालित इंदिरा गांधी (वरिष्ठ) महाविद्यालय, सिडको नांदेड येथे राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त त्या बोलत होत्या. 'विकसित भारताला गती देणाऱ्या वैज्ञानिक महिला' हा मुख्य विषय घेऊन साजरा होणाऱ्या विज्ञान दिनानिमित्त त्यांनी जगप्रसिद्ध अनेक वैज्ञानिक महिलांच्या कर्तृत्वाची उत्प्रेरक कहाणी सांगितली.




महिलांची आर्थिक उत्पादकता 'विकसित भारत -२०४७'साठी अत्यंत गरजेचे आहे. इंदिरा गांधी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी केलेले विज्ञान विभागाच्या विविध क्लबचे आयोजन नक्कीच विकसित भारतासाठी एक पाऊल पुढे टाकणारे आहे, असे त्या म्हणाल्या.

महाविद्यालयातील गणित, रसायनशास्त्र, सूक्ष्म जीवशास्त्र, वनस्पतीशास्त्र, संगणकशास्त्र, भौतिकशास्त्र विभागाच्या वतीने वर्षभर आयोजित विविध उपक्रमांत यशस्वी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. सोबतच गणित विभागात कार्यरत असलेले प्रा. बसवेश्वर जाकोरे यांना भारत सरकारने बौद्धिक संपदा (पेटंट) करिता मान्यता दिल्याबद्दल गौरविण्यात आले. प्रा. जाकोरे, डॉ. डी. बी. कदम, डॉ. आर. बी. पाटील, डॉ. काझी, प्रा. बी. ए. राठोड यांनी यशस्वी विद्यार्थ्यांची माहिती दिली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. दुर्गेश रवंदे म्हणाले की, कोणताही विकास हा व्यक्तीपेक्षा समुहाने अधिक सुंदर, उठावदार होतो. छोट्या छोट्या प्रयत्नांनी यश गाठता येते. विद्यार्थ्यांनी यश आणि गुणवत्तेसाठी सातत्य ठेवणे गरजेचे आहे, असेही ते म्हणाले.

कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. तुगांवकर एस. जी. यांनी कार्यक्रमाच्या पाठीमागील भूमिका विशद केली. राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या पोस्टर प्रेझेंटेशनला उपस्थितांनी दाद दिली. कार्यक्रम यशस्वीतेसाठी विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन कु. शीतल वाघमारे यांनी केले तर आभार कु. राणी शिंदे यांनी मानले.

# शिवार

# कोरडा चारा वापरताना...


**महाराष्ट्रातील बहुतांशी भागात फेब्रुवारी ते जूनपर्यंत दरवर्षी केवळ कोरड्या चाऱ्याचा जास्त प्रमाणात पशुआहारात वापर केला जातो. उपलब्ध कोरड्या चाऱ्याची पचनीयता, पौष्टिकता, चव वाढवून त्याचा पशुआहारात वापर केल्यास निश्चितच कमी चाऱ्यात जनावरांचे संगोपन करणे सोयीस्कर होईल.**



कडबा, सोयाबीन भुसकट- गुळी, गव्हाचे काड, भाताचा पेंडा, उसाचे वाळलेले पाचट आदी वाळल्या चाऱ्याचा निकृष्ट चाऱ्यामध्ये समावेश होतो. हा चारा खाण्यास कठीण, तंतुमय पदार्थाचे प्रमाण जास्त असलेला तसेच प्रथिनांचे प्रमाण अतिशय कमी असणारा चारा असतो. या चाऱ्याला जनावरांना आवडेल अशी चवही नसते. याबरोबरच त्याची पचनीयता सुद्धा कमी असते. अशा प्रकारच्या चाऱ्यातून जनावरांची पोषणतत्त्वांची शारीरिक गरज पूर्ण होत नाही. त्यामुळे पोषणतत्त्वांची गरज पूर्ण करण्यासाठी महागड्या पशुखाद्याचा जास्त प्रमाणात पशुआहारात वापर करावा लागतो. महागड्या पशुखाद्यामुळे उत्पादन खर्च वाढतो. या उपलब्ध निकृष्ट चाऱ्याची पौष्टिकता, पचनीयता वाढवण्यासाठी युरिया, गूळ, मीठ किंवा मळीची प्रक्रिया केली जाते. या उपलब्ध चाऱ्याची पचनीयता व पशुआहारात वापर वाढण्यासाठी आणखीही काही महत्त्वाच्या बाबींचा विचार करणे गरजेचे आहे.

## निकृष्ट चाऱ्याची पौष्टीकता वाढवा

- चाराटंचाई काळात उपलब्ध वाळल्या निकृष्ट चाऱ्याची पचनीयता वाढवण्यासाठी असा चारा देतेवेळी जनावरांना तात्काळ ऊर्जापुरवठा करणाऱ्या घटकांचा पुरवठा करावा. उदा. गूळ, मळी, मका, भरड इ. कारण यामुळे जनावरांच्या कोटीपोटातील तंतुमय पदार्थ पचनासाठी उपयोगी असणाऱ्या जीवाणूंची संख्या वाढून व त्यांची क्रियाशिलता वाढल्यामुळे निकृष्ट चाऱ्याची पचनीयता वाढते.
- टंचाईकाळात जर जनावरांच्या शरीरात नत्र व सल्फरची कमतरता असेल तर कोटीपोटातील पचनासाठी उपयुक्त जीवाणूंच्या क्रियाशीलतेला मर्यादा येतात व त्यामुळे चाऱ्याचे पचन कमी होऊन जनावरं अशक्त होतात. हे टाळण्यासाठी चाराटंचाईकाळात किंवा ज्या ज्या वेळी वाळल्या चाऱ्याचा पशुआहारात जास्त प्रमाणात वापर होत असेल, त्या वेळी जनावरांना योग्य मात्रेत नत्र व सल्फरयुक्त क्षार मिश्रण द्यावे.
- हिरव्या चाऱ्याच्या अभावामुळे जनावरांमध्ये जीवनसत्त्व 'अ' ची कमतरता दिसून येते. या कमतरतेमुळे डोळ्यातून नियमित पाणी येणे, रोगप्रतिकारशक्ती कमी होणे, सतत हगवण लागणे, डोळ्याचा पडदा पांढरा होणे, अंध वासरे जन्मणे अशा समस्या निर्माण होतात. हे सर्व टाळण्यासाठी वाळल्या चाऱ्याचा पशुआहारात जास्त प्रमाणात वापर करतेवेळी दर पंधरा दिवसांतून एकदा जीवनसत्त्व 'अ' युक्त द्रावण तोंडावाटे द्यावे किंवा जीवनसत्त्व 'अ' चे इंजेक्शन द्यावे.



## आहारात क्षार मिश्रण, मिठ गरजेचे...

टंचाईकाळात उपलब्ध चाऱ्यातून क्षार व मीठाचा गरजेप्रमाणे जनावरांच्या शरीराला पुरवठा होत नाही. यामुळे शरीरातील पाण्याचे संतुलन बिघडते तसेच शरीरातील संप्रेरके व इतर उपयुक्त द्रावण तयार होण्याचे प्रमाण घटते, कोटीपोटातील उपयुक्त जीवाणूंची क्रियाशीलता कमी होते, त्यामुळे चाऱ्याची पचनीयता घटते, पोषण तत्त्वांच्या कमतरतेमुळे आजार उद्‌भवतात. याकरिता टंचाईकाळात व इतरवेळीही क्षारयुक्त चाटण विटा गोठ्यात ठेवाव्यात, जेणेकरून जनावरं गरजेनुसार विटांना चाटून आपल्या शरीराची क्षाराची गरज पूर्ण करू शकतील. देशी जनावरांना दररोज किमान ३० ग्रॅम मीठ व संकरीत जनावरं किंवा मुऱ्हा म्हशींना ५०-६० ग्रॅम मीठ दररोज द्यावे.

## चाऱ्यावर प्रक्रिया

भाताचा पेंढा व मका कडब्यावर वाफ/ स्टीम प्रक्रिया केल्यास अशा चाऱ्यातील प्रथिनांची उपलब्धता वाढते. त्यासाठी असा चारा लहान-लहान तुकडे करून स्टिम प्रक्रिया १५ मिनिटे ते अर्धातास दिल्यास पचनीयता वाढते आणि प्रथिनांची उपलब्धता वाढते. शेळ्या/ इतर जनावराना बाहेर चरण्यासाठी चारा उपलब्ध नसल्यास विनाकारण बाहेर चरण्यासाठी सोडू नये, कारण चाऱ्याच्या शोधात दूरवर भटकंतीमुळे जनावरांच्या शरीरातील पोषणतत्त्वांचा साठा वापरला जातो आणि दूरवर फिरूनही जनावरांना गरजेप्रमाणे चारा भेटत नाही, त्यामुळे जनावरं अशक्त, दुबळी बनतात. म्हणून अशावेळी जनावरं चरायला न सोडता उपलब्ध चारा गोठ्यातच द्यावा व व्यायामासाठी जाळीचे कुंपण करून सोडावे.

## पावडर, पिलेटस्‌चा वापर

शेतातील टाकाऊ पदार्थ/ दुय्यम पदार्थ जनावरांना खायला दिले जातात. परंतु असे घटक जनावरे आवडीने खात नाहीत, त्यामुळे पशुआहारात त्यांच्या वापरास मर्यादा येतात. शेतातील दुय्यम पदार्थ/ निकृष्ट चारा यांचा पशुआहारात वापर वाढवण्यासाठी त्याची पावडर बनवून या पावडरीमध्ये पशुखाद्य मिसळून त्याचे पिलेटस् (गोळी/ कांडी) बनविल्यास या चाऱ्याचे खाण्याचे प्रमाण वाढते व पशुखाद्य तसेच चारा एकत्रित दिल्यामुळे, पिलेटस् बनवतानाच्या उष्णतेमुळे निकृष्ट चाऱ्याची पचनीयता वाढते. यामुळे दूधाळशेळ्यांसाठी/ जनावरांसाठी चारा पावडर व पशुखाद्य प्रमाण ६०:४० किंवा ७०:३० असे ठेवता येते. या पशुखाद्यामध्ये किमान १७ टक्के प्रथिने व एकूण पचनीयता ७० टक्के राहावी ही काळजी घ्यावी. चाऱ्यामध्ये, सोयाबीन/ तूर गुळी/ भुसकट, सूर्यफुलाची धाटं, तुराट्या, पराट्या, कडबा, भाताची साळ/ पेंढा, गव्हाचे काड, उसाची पाचट इ. चा वापर करता येतो. भाकड जनावरांसाठी असे पिलेटस् बनविताना ८०: २० असे चारा व पशुखाद्याचे प्रमाण ठेवावे. तसे वासरं, करडं यांच्यासाठी ४०:६० किंवा ५०:५० असे चारा व पशुखाद्याचे प्रमाण ठेवावे.

## बायपास फॅट, प्रथिनांचा वापर

टंचाईकाळात वाळल्या चाऱ्याचा वापर करतेवेळी पशुआहारात प्रोबायोटिक्सचा वापर केल्यास जनावरांच्या शरीरावरील ताण कमी होऊन निकृष्ट चाऱ्यामधून पोषक घटकांची उपलब्धता वाढण्यात मदत होते. कोटीपोटामध्ये पचनक्रिया जलद करण्यासाठी लागणारे सूक्ष्मजीवाणू हे प्रोबायोटिक्सपासून मिळतात व जनावरांची पचनक्रिया वाढून दूध उत्पादनातही वाढ होते. ज्या जनावरांना निकृष्ट दर्जाचा चारा वैरण म्हणून दिला जातो. त्या जनावरांच्या शरीरात पुरेशा प्रमाणात जीवाणूजन्य प्रथिने तयार होत नाहीत. अशा जनावरांच्या आहारामध्ये बायपास फॅट/ बायपास प्रोटीनचा वापर करावा.

# जनावरांच्या डोळ्यांचे आजार !

**प्राणी शरीरात पंचेंद्रियांचे महत्त्व खूप मोठे आहे. डोळे ही त्यातील अत्यंत महत्त्वाचा व नाजूक भाग आहे. निसर्गाने प्राण्यांच्या डोळ्याची रचना ही त्यांच्या परिस्थितीला अनुकूल केली आहे. अंधारात काही प्राण्यांचे डोळे चमकतात. प्राण्यांच्या डोळ्यात असणाऱ्या टपेटम लुसिडम या पडद्यामुळे ते चमकतात. हे नैसर्गिकरित्या त्यांना अंधारात दिसण्याकरिता झालेला नैसर्गिक बदल आहे. गायवर्गीय प्राणी जरी रंगांधळे नसले तरी ते सर्व रंग माणसासारखे पाहू शकत नाही.**



### लक्षणे

- डोळ्यातून सतत पाणी येणे. डोळे लालसर होणे.
- डोळ्यांची उघडझाप करणे किंवा डोळे न उघडणे.
- सुरुवातीस निळसर पांढरा असलेला डोळ्याचा भाग संसर्ग झाल्यास पिवळसर होतो.
- उन्हात गेल्यावर डोळे उघडत नाही.

## जनावरांमध्ये आढळणारे डोळ्यांचे आजार

### डोळ्यांचा संसर्ग

आजार प्रामुख्याने पाश्चिमात्य देशात आढळत असला तरी भारतात काही भागात आढळून आला आहे. हा आजार मुख्यत्वे विषाणू तसेच काही जिवाणूंमुळे ( उदा.मोरेकझेल्ला बोंव्हिस )होतो. अत्यंत वेगाने पसरणारा हा आजार आहे. लहान वासरांमध्ये वयस्कर जनावरांपेक्षा जास्त प्रमाणात आढळून येतो. माश्यांमुळे या आजाराचा प्रसार होतो. डोळ्यातून सारखे पाणी गळणे, अश्रूंनी पूर्ण चेहरा ओला होणे अशी काही लक्षणे सुरवातीच्या काळात दिसतात. हळू हळू पापण्या आणि चेहऱ्यास पू चिकटलेला दिसतो. सूर्यप्रकाशात गेल्या नंतर खूप वेदना होतात. त्यामुळे काही वेळेस जनावर सूर्यप्रकाशात चरायला जाण्यास तयार होत नाही. दोन्ही डोळ्यांमध्ये संसर्ग झाला असल्यास तात्पुरते अंधत्व येऊ शकते. खूप जास्त दिवस विना उपचार राहिल्यास नेत्र पटलास अल्सर होऊ शकतात. लवकर उपचार झाल्यास हा आजार पूर्ण बरा होतो. **उपचार :** पशुवैद्यकाकडून डोळ्यात टाकायचे औषध आणि प्रतिजैवकांची मात्रा द्यावी. नवीन दाखल होणारे जनावर तपासून मगच त्यास गोठ्यात घ्यावे. गोठ्यातील माशांचे नियंत्रण करावे.



### डोळ्यास इजा होणे

जनावरास विविध कारणांमुळे डोळ्यास इजा होते. वैरणीचे खुसपट तसेच झुंज किंवा पळताना इतर जनावराचे शिंग लागून इजा होण्याची शक्यता असते. धारदार वस्तू डोळ्याच्या खोलवर जाऊन विविध पडद्याबरोबर खोलवर जखम होऊन डोळा निकामी होऊन अंधत्व येऊ शकते. वस्तूसोबत किंवा जखमेतून आत गेलेल्या बाहेरील मातीमुळे डोळ्यात संसर्ग होतो. **उपचार :** डोळ्यास जखम झाल्यास स्वच्छ ओल्या कपड्याने डोळा झाकावा. बर्फ कपड्यात घेऊन त्यावर दाबून धरल्यास रक्तस्राव कमी होण्यास मदत होते. लक्ष न दिल्यास जिवाणूंमुळे पू आणि दाह होण्याची शक्यता असते. प्रथमोपचार म्हणून आपण डोळ्यात धूळ किंवा इतर काही जाऊ नये याची काळजी घ्यावी. शस्त्रक्रिया गरजेची असल्यास तातडीने निर्णय घेऊन तज्ञ पशुवैद्यकीय अधिकाऱ्याकडे घेऊन जावे. डोळ्यातील आतील भागामध्ये दाब वाढल्याने डोळा खोबणीच्या बाहेर येतो किंवा नेहमीच्या स्थितीपेक्षा बाहेर आलेला दिसतो. डोळ्यास जोराचे काहीतरी लागणे. डोक्याला जोराचा आघात झाल्यास कवटीच्या आतील भागाचा दाब वाढतो, त्यामुळेसुद्धा डोळा सुजून बाहेर येऊ शकतो. प्रथमोपचार म्हणून डोक्यावर आणि डोळ्यास बर्फ लावावा. आघात किंवा अपघाताने डोक्याला जोरात लागले असल्यास तत्काळ उपचार घेणे अत्यंत गरजेचे असते. त्यामुळे डोळा पूर्ण निकामी होण्यापासून वाचतो. खोबणीतून बाहेर आलेला डोळा खोबणीत परत पूर्ववत ठिकाणी बसवावा.

### डोळा सुजणे

डोळ्यातील आतील भागामध्ये दाब वाढल्याने डोळा खोबणीच्या बाहेर येतो किंवा नेहमीच्या स्थितीपेक्षा बाहेर आलेला दिसतो. डोळ्यास जोराचे काहीतरी लागणे. डोक्याला जोराचा आघात झाल्यास कवटीच्या आतील भागाचा दाब वाढतो, त्यामुळेसुद्धा डोळा सुजून बाहेर येऊ शकतो. **उपचार :** प्रथमोपचार म्हणून डोक्यावर आणि डोळ्यास बर्फ लावावा. आघात किंवा अपघाताने डोक्याला जोरात लागले असल्यास तत्काळ उपचार घेणे अत्यंत गरजेचे असते. त्यामुळे डोळा पूर्ण निकामी होण्यापासून वाचतो. खोबणीतून बाहेर आलेला डोळा खोबणीत परत पूर्ववत ठिकाणी बसवावा.


### डोळ्यात जंत होणे

विविध माशा त्यांच्या जीवन चक्रामध्ये डोळ्याच्या घाणीवर पोषण करतात. त्यावेळी या जंताच्या अळ्या डोळ्यात सोडतात. मग जंत डोळ्यात तयार होतात. सुरुवातीच्या काळात वळवळ करणारा जंत डोळ्यात दिसून येतो. हा जंत डोळ्याच्या पडद्याला चिकटल्यास पडदा पांढरा होतो. जनावराच्या दृष्टीवर याचा परिणाम होतो. हे जंत थेलेजिया किंवा सेटारिया या जातीचे असतात. डोळ्यातून येणाऱ्या घाणीवर माश्या आकर्षित होतात. या माश्या द्वारे या जंताचा प्रसार होतो. **उपचार** : पशू वैद्यकाकडून लवकर शस्त्रक्रिया करून घ्यावी. उशीर केल्यास जंत डोळ्याच्या आतील पडद्याला चिकटून त्याचा दाह करतात. डोळा निकामी होऊ शकतो.

### डोळ्यांचा कर्करोग

कर्करोगाचे नेमके एक कारण नाही. त्यासाठी बऱ्याच गोष्टी कारणीभूत असतात. सूर्यप्रकाशातील अति नील किरण हे सुद्धा डोळ्यांचा कर्करोग होण्यास कारणीभूत आहेत.पांढऱ्या रंगाच्या जनावरांमध्ये हा आजार जास्त प्रमाणात होतो. डोळ्यांचा कर्करोग हा साधारणतः तिसऱ्या पापणीपासून किंवा डोळ्याचा पारदर्शक पडदा आणि पांढरा भाग यांचा जिथे संगम होतो, त्या भागापासून सुरू होतो. ही गाठ वेळीच लक्ष न दिल्यास पूर्ण डोळा व्यापते. डोळा निकामी होऊ शकतो. **उपचार** : सुरुवातीच्या टप्प्यात पशुवैद्यकाकडून उपचार करून घ्यावेत. गाठ पसरण्यास त्यामुळे आळा बसून डोळा वाचू शकतो. खूप मोठी गाठ झाली असल्यास डोळा काढावा लागू शकतो. यामुळे जनावराचे बहुमूल्य प्राण वाचवू शकतो.

### डोळ्यांची काळजी



- गोठ्यात धारदार टोक असणाऱ्या वस्तू जनावरांच्या अंग घासण्याच्या जागेपासून दूर ठेवा.
- डोळ्यांना आलेली घाण स्वच्छ पाण्याने धुवून घ्यावी.
- डोळ्यांना अघोरी पद्धतीने डागणे किंवा बिब्बा भरणे टाळावे.
- डोळ्यात मीठ किंवा तंबाखूची चूळ टाकू नका.
- डोळ्याच्या आजारावर पशूतज्ञांचे मार्गदर्शन घ्यावे. वैदू किंवा स्वतः उपचार करू नयेत.

# उन्हाळ्यात मागणी वाढणारं काकडीचं पीक !

**महाराष्ट्रात काकडीचे पीक खरीप हंगामात आणि प्रामुख्याने उन्हाळ्यात घेतले जाते. काकडीचा गर थंड असतो आणि त्यामध्ये पाण्याचे प्रमाणही अधिक असते. त्यामुळे काकडीला उन्हाळ्यामध्ये चांगली मागणी असते. परिमाणी दरही चांगला मिळतो.**

काकडी साधारणतः कच्ची खातात. याशिवाय कोशिंबीर करण्यासाठीही काकडीचा वापर केला जातो. तसेच घेरकीन या प्रकारची काकडी लोणचे बनविण्यासाठी वापरली जाते. काकडीच्या फळात पोटॅशियम, सोडीयम, फॉस्फरस व इतर खनिजे पुरेशा प्रमाणात आढळतात.





- हवामान : काकडी ही उष्ण हवामानात येणारी फळभाजी आहे. या पिकाच्या वाढीसाठी १८ अंश ते २५ अंश सेल्सिअस तापमानाची आवश्यकता असते. उष्ण कोरडे हवामान या पिकासाठी पोषक ठरते. ११ अंश सेल्सिअसपेक्षा कमी तापमानात बियाण्याची उगवण क्षमता मंदावते.
- जमीन : काकडीचे पीक मध्यम ते भारी जमिनीत घेतले जाते. हे पीक रेताड जमिनीतदेखील घेतात. मात्र, उत्पादनासाठी पोयटायुक्त व भरपूर सेंद्रीय खताचे प्रमाण असलेली व उत्तम निचऱ्याची जमीन निवडावी. निवडलेल्या जमिनीचा सामू ५.५ ते ६.७ पर्यंत असावा. जमीन हराळी, लव्हाळा या सारख्या तणांपासून मुक्त असावी.
- पूर्वमशागत अन् लागवडीची पद्धत : जमिनीची चांगली नांगरट करावी. त्यानंतर जमीन तापू द्यावी. कुळवाच्या पाळ्या देऊन जमीन भुसभुसीत करावी. कुळवाच्या शेवटच्या पाळीपूर्वी २५ ते ३० टन शेणखत प्रति हेक्टर जमिनीत चांगले मिसळून द्यावे. त्यानंतर जमीन सपाट करावी. लागवडीसाठी सरीच्या मध्यभागी दोन वेलींतील अंतर ४५ ते ६० से.मी. प्रत्येक ठिकाणी ३ ते ४ ठेवून बिया टोकाव्यात. बियांमध्ये थोडेसे अंतर ठेवावे. लागवडीनंतर १५ दिवसांनी रोपांची विरळणी करून प्रत्येक ठिकाणी दोन जोमदार रोपे ठेवावीत. लागवडीसाठी सरासरी प्रति हेक्टर २ ते २.५ किलो बियाणे वापरावे. बियांची उगवण चांगली होण्यासाठी बिया २४ ते ४८ तास ओल्या फडक्यात किंवा गोणपाटात बांधून ठेवाव्या. लागवडीपूर्वी कार्बेन्डाझिम २० ग्रॅम प्रति १० लिटर या द्रावणात भिजवून लागवड करावी.

## काकडीच्या सुधारित अन् संकरित जाती...

- फुले प्राची : महात्मा फुले कृषी विद्यापीठाने शिफारस केलेली आणि फक्त मादी फुले असलेली ही संकरीत जात आहे. या जातीचे हरीतगृह तसेच प्रचलित लागवड पद्धतीमध्ये चांगले सरासरी उत्पादन ३५९ क्विंटल प्रति हेक्टर मिळते. फळाचे सरासरी वजन १३५ ग्रॅम आणि लांबी १२ ते १८ सें.मी. असून रंग पिवळसर पांढरा असतो.
- हिमांगी : महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी येथील भाजीपाला सुधार प्रकल्पात विकसित केलेल्या या जातीची खरीप आणि उन्हाळी हंगामासाठी शिफारस करण्यात आली आहे. ही जात लवकर येणारी असून केवडा रोगाला प्रतिकार करणारी आहे. फळांचे वजन साधारणतः १५० ते २०० ग्रॅम असते. आकार दंडगोलाकार व रंग पांढरा असतो. फळे काढल्यानंतर पिवळी पडत नसल्याने बाजारात भावही चांगला मिळतो. या जातीपासून सरासरी १६० क्विंटल उत्पादन मिळते.

### लागवड

काकडीची उन्हाळी हंगामातील लागवड जानेवारी - फेब्रुवारी महिन्यात, तर पावसाळी लागवड जून- जुलै महिन्यात करतात.



# इराणचा सौदीच्या तेल शुद्धीकरण प्रकल्पावर हल्ला, जगाची वाढली चिंता

**तेहरान (वृत्तसंस्था)** – अमेरिका आणि इस्रायल विरुद्ध इराण अशी लढाई सुरू झाल्यामुळे आखाती देशांमध्ये अस्थिरतेचे आणि अनिश्चिततेचे वातावरण आहे. लढाईत तीन देश थेट सहभागी आहेत आणि दहा पेक्षा जास्त देशांचा लढाईत अप्रत्यक्ष सहभाग आहे. मध्य आशियाचे रुपांतर युद्धभूमीत झाले आहे. इराणने आखाती देशांतील अमेरिकेच्या विविध नौदल तळांवर तसेच हवाई दलाच्या तळांवर हवाई हल्ले केले आहेत. या हल्ल्यांना अद्याप संबंधित आखाती देशांनी थेट प्रत्युत्तर दिलेले नाही. या पार्श्वभूमीवर इराणने सौदी अरेबियाची राष्ट्रीय कंपनी असलेल्या 'अराम्को'वर ड्रोनद्वारे हवाई हल्ला केला.



जगातील सर्वात मोठी खनिज तेल कंपनी म्हणून मिरवणाऱ्या 'अराम्को'वर ड्रोनद्वारे हल्ला होणे ही बाब सौदीसाठी प्रतिष्ठेचा विषय झाली आहे. हल्ला झाल्यामुळे 'अराम्को'ने सोमवारी रास तनुरा येथील तेल शुद्धीकरण बंद केलं. रास तुनरा येथील तेल शुद्धीकरण बंद झाल्यावर बेंट क्रूड तेलाच्या किमती ९.३२ टक्क्यांनी वाढल्या. खबरदारीचा उपाय म्हणून रास तनुरामधील तेल शुद्धीकरण प्रक्रिया बंद ठेवण्यात आली आहे. पण परिस्थिती नियंत्रणात आहे. मात्र सौदीच्या कंपनीवर हल्ला झाल्यामुळे अनेक देश चिंतेत आहेत. आखाती देशांतून जगाला मोठ्या प्रमाणात तेलाचा पुरवठा होतो. या परिस्थितीत आखाती देश लढू लागल्यापासून तेलाच्या दरात वाढ होऊ लागली आहे. तेलाच्या दरांनी गेल्या चार वर्षांमधील उच्चांक गाठला आहे. होर्मुज सामुद्रधुनीतून होणारा व्यापार जवळपास ठप्प आहे.

जगातील अनेक देश अराम्को कंपनीकडून तेल खरेदी करतात. यात चीन, जपान, दक्षिण कोरिया, भारत, अमेरिका या प्रमुख देशांचा समावेश आहे. भारत दिवसाला १.१ मिलियन बॅरल्स खनिज तेल सौदी अराम्कोकडून खरेदी करतो. जपान त्यांच्या गरजेच्या ४० टक्के तेल खरेदी अराम्कोकडून करतो. यासोबतच फिलीपीन्स, मलेशिया, थायलंड, सिंगापूर, तैवान, पोलंड, नेदरलँड्स, इटली, स्पेन, फ्रान्स, ग्रीन, इजिप्त, जॉर्डन, बहारिन, दक्षिण आफ्रिकादेखील अराम्कोकडून खनिज तेल खरेदी करतात.

लढाईत तेल विहिरी आणि तेल शुद्धीकरण प्रकल्प यांना वारंवार लक्ष्य केले तर तेलाच्या किंमती उसळण्याचा धोका आहे. यामुळे युद्ध आणखी धोकादायक स्थितीत पोहोचण्याची शक्यता वाढली आहे.

# 'युएई' मध्ये रायगड आणि नवी मुंबईतील नागरिक अडकले; आंतरराष्ट्रीय उड्डाणे रद्द, प्रवाशांना फटका

**रायगड (प्रतिनिधी)** – मध्यपूर्वेत भडकलेल्या तणावाची झळ आता थेट सामान्य प्रवाशांना बसू लागली आहे. इराण, अमेरिका आणि इस्रायल यांच्यात वाढलेल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर आखाती देशांमध्ये सुरक्षेची परिस्थिती गंभीर बनली आहे. त्याचा परिणाम म्हणून अनेक देशांनी आपली हवाई हद्द तात्पुरती बंद केली असून आंतरराष्ट्रीय उड्डाणे रद्द किंवा पुढे ढकलण्यात आली आहेत. या घडामोडींमुळे संयुक्त अरब अमिराती येथे गेलेले रायगड आणि नवी मुंबई परिसरातील काही नागरिक सध्या तेथेच अडकून पडले आहेत.

संघर्ष तीव्र झाल्यानंतर विमान कंपन्यांनी खबरदारीचा उपाय म्हणून उड्डाणे स्थगित करण्याचा निर्णय घेतला. परिणामी, परतीच्या प्रवासाची तयारी करून विमानतळावर पोहोचलेले अनेक प्रवासी अचानक अनिश्चिततेत सापडले. काही जण हॉटेलमध्ये तात्पुरती व्यवस्था करून थांबले आहेत, तर काही प्रवासी विमानतळ परिसरातच परिस्थिती सुधारण्याची वाट पाहत आहेत. सोशल मीडियावरून संपर्क साधत आपल्या कुटुंबियांना धीर देण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

आंतरराष्ट्रीय वृत्तसंस्थांच्या माहितीनुसार, लष्करी हालचाली आणि प्रतिहल्ल्यांच्या पार्श्वभूमीवर आखातातील हवाई क्षेत्र अत्यंत संवेदनशील झाले आहे. इराणकडून अमेरिकन तळांना लक्ष्य केल्याच्या वृत्तांनंतर तणाव आणखी वाढल्याचे सांगितले जात आहे. या पार्श्वभूमीवर नागरी विमान वाहतूक सुरक्षेच्या कारणास्तव मोठ्या प्रमाणावर विस्कळीत झाली आहे. भारतासह विविध देशांतील हजारो



प्रवाशांच्या प्रवासावर याचा परिणाम झाला आहे. दरम्यान, णए मधील भारतीय दूतावास आणि संबंधित यंत्रणा परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून असल्याची माहिती मिळत आहे. अडकलेल्या नागरिकांशी संपर्क साधून आवश्यक ती मदत पुरविण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे सूत्रांनी सांगितले. परिस्थिती स्थिर झाल्यानंतर टप्प्याटप्प्याने उड्डाणे पूर्ववत करण्याचे नियोजन असल्याची माहितीही समोर येत आहे. रायगड आणि नवी मुंबईतील कुटुंबीयांमध्ये मात्र चिंतेचे वातावरण आहे. आपल्या नातेवाईकांची सुरक्षितता आणि परतीचा प्रवास कधी सुरू होणार याबाबत सर्वांच्या नजरा अधिकृत घोषणांकडे लागल्या आहेत. केंद्र शासनाने नागरिकांना अफवांवर विश्वास न ठेवता केवळ अधिकृत सूचनांचे पालन करण्याचे आवाहन केले आहे. परदेशात असलेल्या भारतीयांनी स्थानिक प्रशासन आणि भारतीय दूतावासाशी संपर्कात राहावे, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

# पंतप्रधान मोदींची इराण - इस्रायलच्या प्रमुखांशी चर्चा; सुरक्षा मंत्रिमंडळासोबत बैठक



**अमेरिका (वृत्तसंस्था)** – इस्रायलच्या संयुक्त लष्करी कारवाईनंतर मध्यपूर्वेतील तणावपूर्ण परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर, परराष्ट्र मंत्री एस.जयशंकर यांनी कतारचे पंतप्रधान आणि परराष्ट्र मंत्री शेख मोहम्मद बिन अब्दुलरहमान बिन जसीम अल थानी यांच्याशी फोनवरून चर्चा केली. तर दुसरीकडे पंतप्रधान नरेंद्र मोदींनी इराण - इस्रायलच्या प्रमुखांशी फोनवरून चर्चा केली.

इस्रायल, अमेरिका आणि इराण यांच्यात सुरु असलेल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळाच्या सुरक्षा समितीची (सीसीएस) महत्त्वाची बैठक पार पडली. पंतप्रधानांच्या दिल्लीस्थित निवासस्थानी ही बैठक पार पडली. या बैठकीला संरक्षणमंत्री राजनाथ सिंह, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर आणि अर्थमंत्री निर्मला सीतारामन उपस्थित होत्या.

सूत्रांच्या माहितीनुसार, पश्चिम आशियातील वाढत्या संघर्षामुळे उद्भवलेल्या जागतिक परिस्थितीचा सविस्तर आढावा या बैठकीत घेण्यात आला. विशेषतः या घडामोडींचा भारताच्या सुरक्षेवर, ऊर्जा पुरवठ्यावर, अर्थव्यवस्थेवर आणि परराष्ट्र संबंधांवर होणाऱ्या संभाव्य परिणामांवर चर्चा करण्यात आली. तसेच, परदेशात अडकलेल्या भारतीय नागरिकांना सुरक्षित परत आणण्याच्या उपाययोजनांवरही विचारविनिमय झाल्याचे समजते.

# मुंबईत भर रस्त्यात पत्नीची पतीने केली हत्या



**मुंबई (प्रतिनिधी)** – अंधेरी पूर्व भागातील सागबाग रोडवरील आराध्या रुग्णालयासमोर शनिवार २८ फेब्रुवारी २०२६ रोजी संध्याकाळी साडेचार वाजता एक धक्कादायक घटना घडली. राजेश एकनाथ छत्रे या ४६ वर्षीय व्यक्तीने कौटुंबिक वादातून पत्नी पंचभिला राजेश छत्रे या ३८ वर्षीय महिलेची भर रस्त्यात हत्या केली. पतीने पत्नीवर चाकूने घातक वार केले. यामुळे गंभीर जखमी झालेल्या पंचभिला राजेश छत्रे यांचा थोड्याच वेळात मृत्यू झाला.

या प्रकरणात अंधेरी एमआयडीसी पोलिसांनी राजेश एकनाथ छत्रे याला अटक केली आहे. भर रस्त्यात हत्या झाल्यामुळे परिसरात काही काळ भीतीचे वातावरण होते पण आता परिस्थिती नियंत्रणात असल्याचे पोलिसांनी सांगितले.


हत्येच्या प्रकरणात पोलिसांनी परिसरातले सीसीटीव्ही फुटेज तसेच फॉरेन्सिकच्या दृष्टीने महत्त्वाचे नमुने आणि पुरावे यांचे संकलन केले आहे. गुन्ह्यात वापरलेला चाकू पण जप्त करण्यात आला आहे. पंचभिला यांचा मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवला आहे. एमआयडीसी पोलिसांनी आरोपी विरोधात भारतीय न्याय संहितेच्या कलम १०३(१) तसेच महाराष्ट्र पोलिस कायद्याच्या कलम ३७(१)(अ) आणि १३५ अंतर्गत गुन्हा दाखल केला. आरोपीला अटक करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.

# खामेनींच्या मृत्यूनंतर भारतात हाय अलर्ट, जम्मू काश्मीरमध्ये बंदोबस्तात वाढ

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)** – इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांचा मृत्यू झाला आणि भारतात हाय अलर्ट जाहीर झाला आहे. जम्मू काश्मीरमध्ये बंदोबस्तात वाढ करण्यात आली आहे. अयातुल्ला अली खामेनी हे शिया मुसलमानांचे धर्मगुरु होते. जगातील अनेक देशांतले आणि प्रामुख्याने भारतातले शिया मुसलमान त्यांचा धर्मगुरु म्हणून आदर करत होते. या पार्श्वभूमीवर अमेरिका - इस्रायलच्या हवाई हल्ल्यात खामेनींचा मृत्यू झाल्यानंतर भारतासह अनेक देशांमध्ये ठिकठिकाणी शिया मुसलमानांच्यावतीने अमेरिका आणि इस्रायल यांचा निषेध करण्यासाठी आंदोलनं करण्यास सुरुवात झाली आहे. या पार्श्वभूमीवर देशांतर्गत हाय अलर्ट देण्यात आला आहे तसेच काही ठिकाणी बंदोबस्तात वाढ करण्यात आली आहे.

आंतरराष्ट्रीय घडामोडींचा भारताच्या अंतर्गत सुरक्षेवर परिणाम होऊ शकतो यामुळे देशांतर्गत कार्यरत असलेल्या सर्व सुरक्षा यंत्रणांना केंद्रीय गृहमंत्रालयाने हाय अलर्ट दिला आहे. इराण समर्थक आणि इराण विरोधी गटांच्या कारवायांवर बारकाईने लक्ष ठेवण्याचे आणि इराणी, अमेरिकन आणि इस्रायली दूतावास आणि वाणिज्य दूतावासांभोवती सुरक्षा मजबूत करण्याचे निर्देश केंद्रीय गृहमंत्रालयाने दिले आहेत.

केंद्रीय गृह मंत्रालयाने शिया मिलिशिया तसेच इस्लामिक स्टेट आणि अल-कायदा सारख्या दहशतवादी संघटनांकडून निर्माण होणाऱ्या संभाव्य धोक्यांकडेही लक्ष वेधले आहे. गुप्तचर यंत्रणेने दिलेल्या माहितीवरून असे दिसून येते की दहशतवादी गट अशांतता निर्माण करण्यासाठी या तणावपूर्ण वातावरणाचा फायदा घेण्याचा प्रयत्न करू शकतात. त्यामुळे



विशेष खबरदारी घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

दूतावास, प्रमुख पर्यटन स्थळे, ज्यू संस्था आणि पाश्चात्य-संलग्न आस्थापनांना संभाव्य लक्ष्य म्हणून सूचीबद्ध केले आहे. केंद्र सरकारने राज्यांना मोक्याच्या आणि संवेदनशील ठिकाणी बंदोबस्त वाढवण्याच्या सूचना दिल्या आहेत. गर्दीच्या तसेच संवेदनशील ठिकाणी बंदोबस्त वाढवण्यास सांगितले आहे. तसेच संशयास्पद ठिकाणी तपासणी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

# भारतीय बॅडमिंटनची सुवर्णकन्या अडकली दुबई विमानतळावर

**रायगड (प्रतिनिधी)** – भारतीय बॅडमिंटनची सुवर्णकन्या आणि दोन वेळा ऑलिंपिक पदक विजेती बॅडमिंटनपटू पीव्ही सिंधू शनिवारी (२८ फेब्रुवारी) इंग्लंडमधील बर्मिंगहॅमला जात असताना दुबई विमानतळावर अडकली होती. इराण आणि अमेरिका-इस्रायलमधील वाढत्या तणावामुळे विमान वाहतूक थांबवण्यात आली होती. सिंधू प्रतिष्ठित ऑल-इंग्लंड बॅडमिंटन चॅम्पियनशिपमध्ये सहभागी होण्यासाठी बर्मिंगहॅमला जात होती. त्यानंतर सिंधूने सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर केली, ज्यामध्ये तिच्या प्रकृतीबद्दल अपडेट देण्यात आली आणि ती सध्या सुरक्षित असल्याचे सांगितले.

पीव्ही सिंधूने लिहिले, सध्या काय घडत आहे हे समजणे कठीण आहे. वरून अडथळे ऐकणे आणि सर्वकाही किती लवकर वाढले आहे हे पाहणे खरोखरच भयानक आहे.


੧ੴ ਸਤਿਗੁਰ ਪ੍ਰਸਾਦਿ ॥

ਤਖ਼ਤ ਸੱਚਖੰਡ ਸ੍ਰੀ ਹਜ਼ੂਰ ਅਬਿਚਲਨਗਰ ਸਾਹਿਬ, ਨਾਂਦੇੜ- ੪੩੧ ੬੦੧ (ਮਹਾਰਾਸ਼ਟਰ)-ਭਾਰਤ

Takhat Sachkhand Sri Hazur Abchalnagar Sahib, Nanded-431 601 (Maharashtra) - India

Ph.No. 02462-234813, 241266, 243559

E-Mail:- contact@hazursahib.com roombooking@hazursahib.com Visit us at :- http://www.hazursahib.com

O.W. No. 2810/25-26 Date 02/3/26

PUBLIC NOTICE

Gurudwara Takhat Sachkhand Sri Hazur Abchalnagar Sahib, Nanded

Applications are hereby called for Chartered Accountant/ Firms registered with the Institute of Chartered Accountants of India (ICAI) for appointment as Auditor for conducting the audit of accounts of Gurudwara Sachkhand Board, Nanded.

- Eligibility Criteria:
1. The applicant must be a CA Firm registered with ICAI.
2. Chartered Accountant/ firm must have minimum 3 (Three) years of experience in auditing Gurudwara / Religious Trust / Similar Institutions.
3. The appointed auditor will be required to conduct audit of all accounts, including all ongoing and related works, projects, and activities of the Gurudwara.
4. The appointment process is being carried out with the permission of the Superintendent as per applicable rules.
5. Auditor for conducting the audit of accounts of Gurudwara Sachkhand Board, Nanded for the financial years 2024–25 and 2025–26.
6. CA must visit the GSB Accounts office once in a weak.
7. 1st Preference to Gursikh.

Interested and eligible CA firms may submit their applications along with:

- Firm profile
- Proof of ICAI registration
- Relevant supporting documents

Applications should be submitted before 10-03-2026 within the specified period as decided by the Board.

Sd/- Application Submit to Account Section - 9975033648

By Order Superintendent

Gurudwara Takhat Sachkhand Sri Hazur Abchalnagar Sahib, Nanded

To,

The Editor of Prajawani/Godatir Samachar

Respected Sir,

Publish the advertisement of the Public Notice in the Newspaper on 03/03/2026 and submit the bill after publishing of advertisement in the Newspapers.

Thanking you

Superintendent

Gurudwara Sachkhand Board Nanded.



MAHAVITARAN
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

**Short E-tender Notice No. 15**

The Executive Engineer (Civil), Civil Division, Nanded on behalf of MSEDCL (The Employer) invites online Tenders from reputed, experienced and e-registered firms/ agencies to participate in bidding for following e-tenders.

| Sr. No. | Name of Work | Tender Number | Estimated Cost with GST (Lakhs) |
|---|---|---|---|
| 1 | Drilling of Borewell with installation of submersible pump and other allied works etc at 33 KV stn Mandavi Tq. Kinwat & at 33 KV S/Stn. Lyahari Tq. Hadgaon, under O&M Division Bhokar Dist. Nanded. | EEC/NND/ T-26/2025-26 /2nd Call | 3.13 |
| 2 | Renovation work of EE Cabin & Division office Bhokar, Tq. Bhokar, Dist. Nanded. | EEC/NND/ T-28/2025-26 /2nd Call | 9.65 |
| 3 | Providing various maintenance works, maintenance of existing T/F Plinth, brick lining & metal spreading at 33/11 KV S/Stn. Kalamnuri Tq. Kalamnuri Dist. Hingoli | EEC/NND/ T-31/2025-26 | 9.79 |
| 4 | Civil maintenance works of Store Shed, Staff Cabin & Other allied works at 33/11 KV Sub-station Ghunghrala Tq. Naigaon Dist. Nanded. | EEC/NND/ T-32/2025-26 | 9.97 |

The complete bidding process will be online (e-tendering). Tender documents can be downloaded from website **http://etender.mahadiscom.in** from **03.03.2026 to 08.03.2026 upto 23.55 Hrs.** Bids can be submitted online on or before **14.00 Hrs on 09.03.2026.** All the notifications regarding this tender notice hereafter will be published online on the above cited website.

Sd/-
Executive Engineer (C)
Civil Division, MSEDCL, Nanded

PRO No. 183/26 Date: 02.03.2026



**Change In Name**

My Old Name is **MD ANWARUDDIN FAROOQUI** which now I am changing as New Name **MOHAMMED ANWARUDDIN FAROOQUI.** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.

**Address - 13-183, Labour Colony, Nanded - 431602**
**Mo.No. 7020652096**



**जाहीर प्रगटन**

मौजे नांदेड येथील विवेकानंद गृहनिर्माण संस्था मर्या. गोपाळचावडी ता.जि. नांदेड जयप्रकाश कर्मचारी सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. ता.जि.नांदेड मधील प्लॉट नं. २२ अ ज्याचे एकूण क्षेत्रफळ १३०० चौ.फुट जागेवर आर.सी.सी. बांधकाम केलेली मालमत्ता सौ. नम्रता लक्ष्मीकांत जगळपुरे रा. विवेकानंद सोसायटी नांदेड यांचेकडून राजू दत्ता ढेपाळे रा. तुप्पा ता.जि. नांदेड यांनी विकत घेण्याचा सौदा केला असून बयाना म्हणून काही रक्कम दिली आहे.

प्लॉटची चतुःसिमा- पूर्वेस - प्लॉट नं. २२ अ, पश्चिमेस - रस्ता, दक्षिणेस - सदरील प्लॉट चा भाग ११ ब व उत्तरेस - प्लॉट क्र. २१ आटी पामेलू यांचे घर.

तरी वरील चतुःसिमेच्या आतील प्लॉट बद्दल कोणाचा हक्क, उजर, दावा, आक्षेप, सरकारी किंवा निमसरकारी बोजा असेल त्यांनी आपला उजर, आक्षेप हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्यावर सादर करावा. मुदतीनंतर आलेला उजर, आक्षेप ग्राह्य धरल्या जाणार नाही व नंतर प्लॉटचे हस्तांतरण राजू दत्ता ढेपाळे यांच्या नावे करून घेण्यात येईल.

करीता हे जाहीर प्रगटन.

**जाहीर प्रगटन देणार**
**स्वामी विवेकानंद सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या.**
**गोपाळचावडी ता.जि. नांदेड**
**मो.नं. ९४२१८५०४७५, ९७३०३२९३९१**



**4000 x 4 =16000 इस्क्वायर फूट**
**4 मजली हॉस्पिटल, लॉजिंग, बोर्डिंग, ऑफिस, यासाठी किरायाने देणे आहे**
9763226190
7972231307
पत्ता : कामठा बायपास गट नं. 2015 प्लॉटनं. 2 गुरुकृपा कॉप्लेक्स, शंकरराव चव्हाण चौक, नांदेड-431605



**प्लॉट विकणे आहे**

नांदेड - लातूर हायवे रोडवर मुसलमानवाडीच्या अलिकडे ब्रिजजवळ गजानन महाराज मंदिराजवळ २०० बाय १०० म्हणजे २० हजार चौरस फुट किंवा १०० बाय १०० म्हणजे १० हजार फुट जागा व त्यावरील १२.३ दुकाने बांधकामसह तीन साईट रोड टच असलेली मालमत्ता त्वरीत विकणे आहे.

मो.नं. ८२७५५१०००६, ९४०३६३६९००



**कुत्रीचे पिल्ले विकणे आहे**

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रॅडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८



**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९७०१, ९८६०७२१३५६



# गोदातीर समाचार



**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308






नांदेड-येथे आयोजित कुसुम महोत्सवात प्रसिद्ध गायक कैलाश खैर यांच्या कैलासा कॉन्सर्टचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगीच्या छायाचित्रात माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, आ. श्रीजया चव्हाण, माजी पालकमंत्री डी. पी. सावंत, माजी आमदार अमर राजूरकर, माजी आ. अमिताताई चव्हाण, महापौर कविता मुळे, माजी महापौर शैलजा स्वामी, सुजया चव्हाण, मृणाल राजूरकर दिसत आहेत.

## फूल मार्केट व्यापाऱ्यांचे अशोकराव चव्हाणांना साकडे; तूर्त तरी कारवाई न करण्याच्या दिल्या सूचना

**नांदेड (प्रतिनिधी)–** हिंगोली गेट अंडर ब्रिजखाली मागील अनेक वर्षांपासून बसविण्यात आलेल्या फूल मार्केटचा करार संपल्यानंतरही येथे फूल मार्केट सुरू असल्याच्या तक्रारी महापालिकेकडे प्राप्त झाल्या. या प्रकरणात तक्रारकर्त्याने फूल बाजार उठवावा व त्या ठिकाणी गार्डन तयार करावे, अशी मागणी केली. तेव्हा फूल मार्केट व्यापाऱ्यांनी माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांना साकडे घालून न्यायाची मागणी केली. सर मागणीची दखल घेऊन खा. अशोकराव चव्हाण यांनी बैठकीमध्ये तूर्त तरी फूल व्यापाऱ्यांवर कारवाई न करण्याच्या सूचना महापालिका प्रशासनाला दिल्या असल्याचे महापालिकेच्या सूत्राने सांगितले.

खा. अशोकराव चव्हाण यांनी फूल मार्केट संदर्भात जिल्हाधिकारी कार्यालय येथे दि. १ मार्च रोजी बैठक घेतली. महापालिकेने नियमानुसार फूल मार्केटमध्ये ३९ गाळे दिले होते. त्यापैकी २०२३ ला करारनामा संपला आहे. सदर ठिकाणचे अतिक्रमण काढण्याबाबत निवेदन प्राप्त झाले होते. याबाबत खा. चव्हाण यांनी सदर फूल मार्केटच्या व्यापाऱ्यांचे पुनर्वसन केल्याशिवाय त्यांना स्थलांतरित करण्यात येऊ नये, असे निर्देश दिले.

तसेच नवीन ठिकाणी जागा देताना जुन्या व्यापाऱ्यांच्या समवेत नव्याने प्राप्त अर्जांचा विचार करावा. तसेच नव्या ठिकाणी जागा वाटप करण्याची सर्व समावेशक प्रक्रिया करावी आणि तोपर्यंत फूल मार्केट येथे कोणत्याही प्रकारची कार्यवाही करण्यात येऊ नये, असेही निर्देश दिले. या बैठकीस जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, निवासी उपजिल्हाधिकारी किरण आंबेकर, महापालिका अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम, महापालिका उपायुक्त अजितपालसिंग संधू यांची उपस्थिती होती.

### पुस्तक वाचन हाच नटासाठी फार मोठा रियाज

## विद्रोही साहित्य संमेलनात प्रख्यात सिने अभिनेते मिलिंद शिंदे यांची मुलाखत ठरली लक्षवेधी

**नांदेड (प्रतिनिधी)** –२० व्या विद्रोही मराठी साहित्य संमेलनातील विशेष आकर्षण ठरलेली प्रख्यात सिनेअभिनेते व कवी मिलिंद शिंदे यांची मुलाखत उत्स्फुर्त प्रतिसादात पार पडली. माध्यम अभ्यासक व संमेलनाचे मुख्य निमंत्रक डॉ. राजेंद्र गोणारकर यांनी ही मुलाखत घेतली. रंगभूमीपासून रुपेरी पडद्यापर्यंतचा त्यांचा प्रवास, संघर्ष, साहित्यप्रेम आणि दिग्दर्शनाचा अनुभव या संवादातून उलगडला.



अभिनयाविषयी बोलताना मिलिंद शिंदे म्हणाले, 'आपण केलेली भूमिका नंतर जगात कुणालाही करता आली नाही पाहिजे.' कलाकाराने व्यक्तिरेखेला स्वतःची स्वतंत्र छाप दिली पाहिजे, तीच त्याची खरी ओळख ठरते, असे त्यांनी स्पष्ट केले. अभिनय ही सातत्याने करावयाची साधना असल्याचे सांगत त्यांनी नमूद केले, 'पुस्तक वाचन हाच नटासाठी फार मोठा रियाज आहे.' वाचनामुळे संवेदनशीलता वाढते, भाषेची ताकद प्राप्त होते आणि व्यक्तिरेखेचा अंतर्भाव अधिक प्रभावीपणे साकारता येतो, असे ते म्हणाले. जीवनप्रवासातील टप्प्यांवर भेटलेल्या व्यक्तींचा उल्लेख करताना त्यांनी सांगितले, 'वेगवेगळ्या टप्प्यावर वेगवेगळी चांगली माणसं भेटली पाहिजेत. ही माणसं भेटली तरच आपल्या आयुष्याला खरा आकार मिळतो.' गुरू, सहकलाकार आणि सामान्य माणसांकडून शिकत राहणे हीच कलाकाराची खरी संपत्ती असल्याचे त्यांनी नमूद केले.

मराठी सिनेमा बदलत असल्याच्या संदर्भाने बोलताना ते म्हणाले, 'डुक्कर पकडणारा मुलगा सिनेमाचा हिरो होईल असं कुणी म्हटलं असतं तर लोक हसले असते.' पूर्वी नायकाविषयी विशिष्ट धारणा गृहीत धरल्या जात होत्या, मात्र आज मराठी सिनेमा आशयप्रधान आणि वास्तववादी बनला असून, तळागाळातील प्रतिभेलाही संधी मिळत असल्याचे त्यांनी सांगितले.

अभिनयासोबत दिग्दर्शनाचा अनुभव मांडताना त्यांनी स्पष्ट केले, 'मराठीमध्ये दिग्दर्शक होणं म्हणजे जवळपास शिपायाचं काम.' मर्यादित आर्थिक बळ, अपुरी साधनसामग्री आणि बहुपदरी जबाबदाऱ्या यामुळे दिग्दर्शकाला प्रत्येक स्तरावर काम करावे लागते, असे ते म्हणाले. मात्र याच प्रक्रियेतून चित्रनिर्मितीचे खरे भान येते. डॉ. राजेंद्र गोणारकर यांच्या नेमक्या प्रश्नांमुळे मुलाखतीला रंगत आली. संघर्षातून उभा राहिलेला कलाकार, साहित्याशी असलेले नाते आणि बदलत्या मराठी सिनेमाचा प्रवास या सर्व अंगांनी उलगडलेला संवाद उपस्थितांसाठी प्रेरणादायी ठरला.

### आरपीएफ नांदेड विभागाकडून प्रवासी सुरक्षेसाठी कडक उपाययोजना

## ऑपरेशन नन्हे फरिश्ते, ऑपरेशन यात्री सुरक्षा अंतर्गत यश



**नांदेड (प्रतिनिधी) –** दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागामार्फत रेल्वे संरक्षण दल (आरपीएफ) आणि गुन्हे गुप्तवार्ता शाखा (सीआयबी) यांनी लोहमार्ग पोलीस (जीआरपी) च्या समन्वयाने प्रवासी सुरक्षा, संरक्षण आणि बालक संरक्षणासाठी सातत्यपूर्ण मोहिमा राबवून आपली कटिबद्धता पुन्हा अधोरेखित केली आहे.

दि. २८ फेब्रुवारी रोजी गाडी क्र. १२७१६ एक्सप्रेस जालना रेल्वे स्थानकावर आल्यानंतर आरपीएफच्या सतर्क कर्मचाऱ्यांनी सामान्य डब्यात एक अल्पवयीन मुलगा संशयास्पद परिस्थितीत एकटाच प्रवास करताना आढळला. चौकशीदरम्यान कोणत्याही सहप्रवाशाला त्याच्या बाबत माहिती देता आली नाही.

त्या मुलास तात्काळ सुरक्षित ताब्यात घेऊन आरपीएफ पोस्ट जालना येथे आणण्यात आले. चौकशीदरम्यान त्याने आपल्या मोठ्या भावाला न सांगता घर सोडल्याचे सांगितले. त्याचा मोठा भाऊ छत्रपती संभाजीनगर येथे कार्यरत आहे. आरपीएफने तात्काळ कुटुंबाशी संपर्क साधून बालकल्याण समिती (सीडब्ल्यूसी) जालना यांच्याशी समन्वय साधला. आवश्यक पडताळणीनंतर संबंधित बालकास पुढील कायदेशीर संरक्षणासाठी बालकल्याण समितीकडे सुपूर्द करण्यात आले. ही वेळेवर करण्यात आलेली कारवाई ऑपरेशन नन्हे फरिश्ते अंतर्गत आरपीएफच्या मानवीय बांधिलकीचे द्योतक आहे. या उपक्रमाचा उद्देश रेल्वे परिसरातील असुरक्षित व अल्पवयीन मुलांचे रक्षण व पुनर्वसन करणे हा आहे.

## प्राणीमित्र पद्धतीने होळी-रंगपंचमी साजरी करूया

### पाळीव किंवा भटके प्राणी, पक्ष्यांना सुका, ओला रंग लावू नका

**नांदेड (प्रतिनिधी) –** प्राण्यांना सणांची समज नसते. त्यांच्यासाठी मोठा आवाज, अचानक अंगावर येणारे रंग, पाण्याचे फुगे आणि आक्रमक वर्तन अत्यंत भीतीदायक आणि जीवघेणे ठरू शकते. रासायनिक रंगांमुळे त्यांची त्वचा आणि डोळे जळू शकतात. नागरिकांनी हा रंगांचा सण साजरा करताना भटके कुत्रे, मांजर, गुरे, पक्षी किंवा पाळीव प्राणी यांना कोणत्याही प्रकारचा ताण, इजा किंवा त्रास होणार नाही, याची काळजी घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

होळी हा आनंद, मैत्री आणि वाईटावर चांगल्याच्या विजयाचे प्रतीक असलेला सण आहे. यंदा हा सण मंगळवार, दि. ३ मार्च २०२६ रोजी देशभरात साजरा केला जाणार आहे. भारतीय जीवजन्तू कल्याण बोर्डच्या मार्गदर्शक सूचनांनुसार नागरिकांनी हे लक्षात ठेवणे महत्त्वाचे आहे की, प्राण्यांना वेदना, दुखापत किंवा त्रास देणे हा प्राण्यांना क्रूरतेने वागविण्यास प्रतिबंध करण्याबाबतचा कायदा, १९६० अंतर्गत शिक्षेस पात्र गुन्हा आहे. तसेच सण दयाळूपणे साजरा करणे हे केवळ आपले नैतिक कर्तव्यच नाही तर प्राण्यांच्या कल्याणाशी संबंधित कायद्यानुसार बंधनकारक देखील आहे.

**नियमांचे पालन करा**–पाळीव प्राणी, भटके प्राणी आणि पक्षी यांच्यावर सुका किंवा ओला रंग लावणे टाळा. प्राण्यांवर पाण्याचे फुगे फेकू नका किंवा रंगीत पाणी उडवू नका, कारण यामुळे ते घाबरू शकतात आणि त्यांना गंभीर दुखापत होऊ शकते. आपले पाळीव प्राणी घरात किंवा सुरक्षित आणि शांत ठिकाणी असल्याची खात्री करा आणि भटक्या प्राण्यांना गर्दीच्या किंवा गोंधळाच्या ठिकाणांपासून दूर राहण्यास मदत करा. सण साजरा केल्यानंतर परिसराची स्वच्छता राखा आणि प्राण्यांच्या पोटात हानिकारक पदार्थ जाऊ नयेत यासाठी रंगांचे अवशेष, प्लास्टिकचा कचरा आणि फुगे गोळा करून त्यांची योग्य विल्हेवाट लावा. होळी प्राण्यांना अनुकूल आणि दयाळूपणे साजरी करण्याबाबत लहान मुले, मित्र आणि शेजाऱ्यांमध्ये जनजागृती करा, असे आवाहन एसपीसी समिती आणि जिल्हा प्रशासनाच्यावतीने करण्यात आले आहे.

## भाजप महानगर व्यापारी आघाडीच्या वतीने महापौर आणि उपमहापौर यांचा सत्कार



**नांदेड (प्रतिनिधी)** –येथील भाजप व्यापारी आघाडीचे महानगराध्यक्ष प्रेमकुमार फेरवानी यांच्या निवासस्थानी नवनिर्वाचित महापौर कविता संतोष मुळे आणि उपमहापौर दीपकसिंह रावत यांचा कौटुंबिक सत्कार सत्कार करण्यात आला.

शहरातील प्रमुख उद्योजक, विविध व्यावसायिक संघटनांचे प्रतिनिधी आणि भाजप व्यापारी आघाडीचे पदाधिकारी यावेळी उपस्थित होते. उपस्थित सर्व व्यापारी आणि उद्योजकांनी नवनिर्वाचित महापौर आणि उपमहापौरांचा सत्कार केला व त्यांच्या आगामी कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या. शहराच्या विकासासाठी व्यापाऱ्यांनी परिपूर्ण सहकार्य करण्याचा विश्वास व्यक्त केला.

या प्रसंगी भाजपा सरचिटणीस शीतल खांडील, नवा मोंढा भाजपा मंडळ अध्यक्ष भालचंद्र पवळे, सराफा संगटना अध्यक्ष सुधाकरराव टाक, क्रेडाईचे प्रदेश सदस्य रवी कडगे, दीपक खियानी, शंकर धनवानी, मनीष हिराणी, अन्नू जेठानी, भाजपा व्यापारी आघाडीचे हरीश लालवानी, राजेश भराडिया, किर्ती छेडा, किरण मामीडवार यांच्यासह पदाधिकारी आणि सदस्य उपस्थित होते.

## बीटापासून तयार केलेला रंग विद्यार्थ्यांनी एकमेकाला लावून रंगोत्सव केला साजरा



**नांदेड (प्रतिनिधी)** –येथील सामाजिक वनीकरण विभागामधील परिक्षेत्र नांदेडमध्ये पर्यावरण शिक्षण कार्यक्रम अंतर्गत इको फ्रेंडली होळी साजरी करण्यात आली. तसेच बिटापासून तयार केलेला रंग विद्यार्थ्यांनी एकमेकांना लावून रंगोत्सव साजरा केला.

विभागीय वन अधिकारी संदीप चव्हाण व सहायक वनसंरक्षक श्रीकांत जाधव व वनपरिक्षेत्र अधिकारी गिरीश लखेकर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हरित सेना शाळा प्रतिभा निकेतन हायस्कूल श्रीनगर नांदेड येथे पर्यावरण पूरक होळी कशी खेळावी याबद्दल विद्यार्थ्यांना होळीचे कलर तयार करण्याचे मार्गदर्शन करून बीटापासून तयार केलेल्या रंग विद्यार्थ्यांनी एकमेकांना लावून दाखवून रासायनिक रंगापासून होणाऱ्या नुकसानीबद्दल सामाजिक वनीकरण विभागाचे वनपाल अशोक क्यदारवाड यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेचे मुख्याध्यापक अशोक मुकदलकर व सहशिक्षकवृंदानी सहकार्य केले.

## हल्लाबोल व होळी उत्सवासाठी हजारो शीख बांधव नांदेडमध्ये दाखल

**नांदेड (प्रतिनिधी)** –येथील प्रसिद्ध सचखंड गुरुद्वारा येथे होली उत्सवाला प्रारंभ झाला आहे. नांदेड येथे होली उत्सव साजरा करण्यासाठी देश-विदेशातून हजारो शीख बांधव दाखल झाले असून, बुधवार, दि. ४ मार्च रोजी हल्ला-महल्ला मिरवणूक काढण्यात येणार आहे.

नांदेड शहर हे शीख धर्मीयांचे महत्वपूर्ण एक धार्मिक स्थळ आहे. येथील सचखंड गुरुद्वारामध्ये गेल्या अनेक वर्षांपासून परंपरेनुसार होली उत्सव धार्मिक विधीप्रमाणे पाच दिवस साजरा केला जातो. होली उत्सवाला सचखंड गुरुद्वारा येथे सुरुवात झाली. गुरुद्वारामध्ये अखंड पाठ प्रारंभ करण्यात आला आहे. होली उत्सवासाठी देशभरातून हजारो भाविक नांदेड शहरात दाखल होत आहेत. यात्रेकरूंच्या निवासाची सोय सचखंड गुरुद्वारा बोर्डामार्फत विविध यात्री निवास, मंगल कार्यालय या ठिकाणी करण्यात आली आहे.



**नांदेड –** होळीनिमित्त नवीन मोंढा येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मैदानावर सोमवारी महामूर्ख कविसंमेलन पार पडले. या महामूर्ख कविसंमेलाचे उद्घाटन कृउबा समितीचे सभापती संजय देशमुख लहानकर यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी घेतलेल्या छायाचित्रात संमेलनाचे अध्यक्ष उपमहापौर दीपकसिंह रावत, बाबुराव पुंजरवाड, अॅड. दिलीप ठाकूर यांच्यासह इतर आयोजक व निमंत्रित कवी दिसत आहेत.

## आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त ८ मार्च रोजी अस्मिता महिला लीगचे आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)** –भारत सरकार, युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालय (एमवायएस) यांचेकडून प्राप्त पत्रानुसार आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त 'अस्मिता महिला लीग' आयोजनासंबंधी मानक कार्यपद्धती निर्गमित करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने जिल्हामध्ये भारतीय क्रीडा प्राधिकरण, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, नांदेड, खेलो इंडिया, माय भारत, युवा कार्य, क्रीडा मंत्रालय, भारत सरकार यांच्या संयुक्त विद्यमाने व सायन्स कॉलेज नांदेड यांच्या सहकार्याने दि. ८ मार्च रोजी 'अस्मिता महिला लीग स्पर्धांचे आयोजन सायन्स कॉलेज, नांदेड येथे करण्यात आले आहे.

महिला खेळाडूंना स्पर्धात्मक व्यासपीठ उपलब्ध करून देणे, क्रीडा सहभाग वाढविणे व स्थानिक स्तरावर क्रीडा चळवळ बळकट करणे, आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त महिला सक्षमीकरणाचा संदेश देणे, जिल्हा स्तरावर क्रीडा संरचना व तांत्रिक क्षमता विकसित करणे हा या स्पर्धेचा मुख्य उद्देश असल्याचे सांगण्यात येते. स्पर्धेची रचना क्रीडा प्रकारः ॲथलेटिक्स प्रस्तावित स्पर्धाः धावण्याच्या स्पर्धा : १०० मीटर, २०० मीटर, ४०० मीटर या बाबीचा समावेश असून यामध्ये वयोगटः १३ वर्षाखालील १३ ते १८ वर्षे, १८ वर्षावरील मुली व महिलांचा समावेश राहील.

वय पडताळणी नोंदणीच्या वेळी पुढील कागदपत्रांच्या आधारे वय निश्चित करण्यात येईल. आधार कार्ड (प्राधान्याने), राज्य/केंद्र शासनाने दिलेला जन्मतारीख नमूद असलेला पुरावा, दहावी उत्तीर्ण प्रमाणपत्र इत्यादी नोंदणीदरम्यान खेळाडूंचे वय, वजन व उंची नोंदविणे आवश्यक राहील याकरिता नांदेड जिल्ह्यातील मुली व महिला खेळाडूंनी SMIT Portal वर अपली नांवे दि. ७ मार्च २०२६ पर्यंत आवश्यक कागदपत्रासह अपलोड करणे बंधनकारक आहे. यामध्ये पहिला, दुसरा व तिसरा विजेत्या खेळाडूंना मेडल देवून मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात येणार आहे.

## मुक्त विद्यापीठ कृषी विज्ञान केंद्रातर्फे शेतकऱ्यांसाठी उपयुक्त

### यश मायक्रो सूक्ष्म अन्नद्रव्ययुक्त खताचे लोकार्पण; बाजारात विक्रीसाठी उपलब्ध

**नाशिक (प्रतिनिधी)** –यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ येथील कृषी विज्ञान केंद्र निर्मित 'यश मायक्रो न्यूट्रियंट ग्रेड-२' हे सूक्ष्म अन्नद्रव्ययुक्त खत बाजारात विक्रीसाठी उपलब्ध करण्यात आले आहे. विद्यापीठाच्या विज्ञान विद्याशाखेतर्फे राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात या उत्पादनाचे लोकार्पण करण्यात आले.

यावेळी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे, प्रमुख अतिथी तथा संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेचे (डीआरडीओ) ओझर येथील शास्त्रज्ञ राजेंद्र पाटील, विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन, विद्यापीठ व्यवस्थापन मंडळ सदस्य डॉ. संजीवनी महाले, निरंतर शिक्षण विद्याशाखा संचालक डॉ. जयदीप निकम, कृषी विज्ञान विद्याशाखा संचालिका डॉ. माधुरी सोनवणे, कृषी विद्यान केंद्र शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ. नितीन ठोके, विज्ञान विद्याशाखा संचालिका डॉ. चेतना कामळस्कर यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलताना विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे म्हणाले की, विज्ञानाने केलेल्या प्रगतीचा व विद्यापीठ कृषी विज्ञान केंद्राच्या संशोधन कार्याचा फायदा थेट शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत पोहोचण्यास या उत्पादनामुळे मदत होईल. शास्त्रज्ञ राजेंद्र पाटील यांनी या उपक्रमाचे कौतुक करत ही उत्पादन निर्मिती प्रक्रिया इतरांसाठी मार्गदर्शक व अभ्यासाचा विषय असल्याचे गौरवोद्गार काढले. कृषी विद्यान केंद्र शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ. नितीन ठोके यांनी विद्यापीठ कृषी विज्ञान केंद्राचे हे सतरावे उत्पादन असल्याचे सांगत सदर उत्पादनाची वैशिष्ट्ये नमूद करत निर्मिती प्रक्रियेची मुद्देसूद माहिती दिली. या उत्पादन प्रक्रियेत कृषी



विद्यान केंद्र शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ. नितीन ठोके, कार्यक्रम सहाय्यक मंगेश व्यवहारे, शैक्षणिक संयोजक अमोल पुंड व सौ. योगिता सावकार, प्रयोगशाळा सहाय्यक मनोहर चौधरी यांचा सक्रिय सहभाग राहिला आहे. राहुरीच्या महात्मा कृषी विद्यापीठाचे सेवानिवृत्त मृदा शास्त्रज्ञ डॉ. अनिल दुरगुडे यांचे विशेष सहकार्य लाभले.

यावेळी विद्यापीठातील सर्व विद्याशाखा संचालक, प्राध्यापक, प्रशासकीय अधिकारी कर्मचारी, शैक्षणिक संयोजक आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आजच्या आधुनिक शेतीत शेतकरी प्रामुख्याने नत्र (Nitrogen), स्फुरद (Phosphorus) आणि पालाश (Potassium) यांचा वापर मोठ्या प्रमाणात करतात. मात्र, जमिनीमध्ये लोह, मँगेनीज, झिंक, तांबे, बोरॉन आणि मॉलिब्डेनम यांसारख्या सूक्ष्म अन्नद्रव्यांची मोठी कमतरता भासत आहे. ही उणीव भरून काढण्यासाठी मुक्त विद्यापीठ कृषी विज्ञान केंद्राने खास 'यश मायक्रो न्यूट्रियंट ग्रेड-२' ची निर्मिती केली आहे.


**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com